सं. वाचनालय, ठाणे
क्र. ५७८८




# बुद्धचरित

## काशीनाथ पोतदार

IRBK-0105788

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगाव, मुंबई



# बुद्धचरित

## काशीनाथ पोतदार


अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

अ. क्र.
नों. दि.
वि.

IRBK-0105788
IRBK-0105788

श्रीधर प्रकाशन

मूल्य दीड रुपया




पहिली आवृत्ति : बुद्धजयंती, १९५६

मुद्रक : श्री. बा. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : के. सि. ढवळे
श्रीधर प्रकाशन
कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन







१९५४ च्या हिंवाळ्यांत सिमल्याच्या जाकू टेकडीवर अचानक एका फ्रेंच बुद्ध भिक्षूशीं माझी गांठ पडली. बाहेर अखंड हिमवर्षाव होत होता. आश्रयार्थ आम्ही मंदिरांत शिरलों. तेथें एडविन् ॲर्नोल्डूच्या "दि लाइट् ऑफ एशिया" मधील कांहीं अविस्मरणीय कविता म्हणून दाखवून त्या भिक्षूनें माझ्या मनांत गौतम बुद्ध व बौद्ध धर्म ह्यांविषयींचें कुतूहल पेरलें. "तुमचा देश महान् आहे. २५०० वर्षांपूर्वी ह्या भूमींत तथागताचा जन्म झाला. गांधी ह्याच देशांत जन्मले ... धन्य! धन्य!!"

हे त्याचे उद्गार कित्येक दिवस माझ्या कानांत घुमत होते. तेव्हांपासून मी बुद्धावरील बरेच ग्रंथ वाचले. विहारांत जाऊन माहिती मिळविली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कायदेमंत्री श्री. दादासाहेब पाटसकर, श्री. पु. मं. लाड, आय्. सी. एस्. ह्यांच्यासारख्यांशीं क्वचित् प्रसंगीं चर्चा करण्याचीही संधि मिळाली. त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केलीच पाहिजे. जयंतीच्या निमित्तानें, मुख्यतः विद्यार्थीवर्ग डोळ्यांसमोर ठेवून हें पुस्तक लिहिलें आहे.


काशीनाथ पोतदार




सृष्टि धन्य झाली ! १
अद्भुतरम्यतेचें वलय ४
मायेस झालेला साक्षात्कार ८
शिव-शक्तीची भेट १५
गुलाबाचा कांटा २
बंधनांतील मुक्तात्मा २६
निद्रेंतून जागृतीकडे २९
शाश्वत सुखासाठीं ३३
आश्रमांत आगमन ३६
प्रखर देहदंडानंतरही प्रकाश नाहीं ४०
बोध-प्राप्ति ४४
तृष्णेपासून मुक्त ४८
बहुजनहिताय बहुजनसुखाय ५२
दीन-दुबळ्यांचा वाली ५६
चमत्कारास स्थान नाहीं ! ६०
पिता-पुत्राची हृदयस्पर्शी भेट ६४
यशोधरेचा गौरव ६९
राहुलाला उज्ज्वल वारसा ७४
बुद्धांची दिनचर्या ७९
नर्तिका आम्रपालीचा आदर ८३
अजातशत्रूचीं कारस्थानें ८९
स्त्रियांना अनिच्छेनें संघांत प्रवेश ९३
बुद्धांचा शिष्यगण ९७
आत्म्याचा शोध घ्या १०१
पूर्वजन्मींची हृद्य आठवण १०५
भवसागरांत तुम्ही बेट बना १०८





अनुक्रम 2252
विभाग
क्रमांक 9052
नों. दि



# सृष्टि धन्य झाली!

हिमालयाचीं धवल शिखरें आरशाप्रमाणें लकाकलीं. निर्झरांनीं गिरिकंदरांतून बेहोषपणें उड्या मारल्या. सूर्यकिरणांनीं चराचर सृष्टीवर सोनेरी रंगाचा कुंचला फिरविला. वृक्षलता डोलूं लागल्या. सृष्टि धन-धान्यांनीं, फळांफुलांनीं बहरली. पक्ष्यांनीं सामवेद-गान सुरू केलें. वाऱ्यानें क्षणांत राजपुत्राच्या जन्माची वार्ता सर्वत्र पोचविली. मंदिरांतून प्रार्थना सुरू झाल्या. लोकांनीं गुढ्यातोरणें उभारलीं. राजा, राणी आणि प्रजाजन



लोकांनीं गुढ्यातोरणें उभारलीं.


ह्या सर्वांच्याच अनेक दिवसांच्या आशा-आकांक्षांची पूर्ति झाल्यानें मुलाचें नांव सिद्धार्थ ठेवण्यांत आलें. सृष्टि धन्य झाली !


सिद्धार्थाच्या पित्याचें नांव शुद्धोदन, आईचें नांव माया व कुलनाम गौतम. शुद्धोदन म्हणजे शुद्ध तांदूळ. ह्यावरून सिद्धार्थाचें घराणें शेतकरी असावें असा तर्क काढला जातो. शुद्धोदन हा कांहीं मोठा राजा नव्हता. त्याच्या शाक्यवंशीय पूर्वजांनीं आसपासच्या सम्राटांना युद्धांत मदत करून लहानशी जहागीर मिळविली होती. शुद्धोदनानें आपल्या बाहुबलानें ती वाढविली. चारित्र्य व शौर्य ह्या उभय गुणांसाठीं शुद्धोदनाची प्रसिद्धि होती. कोशल, मगध ( आजचा दक्षिण बिहार ) व विदेह ( आजचा उत्तर बिहार ) हीं त्या काळचीं प्रमुख राज्यें. अयोध्या, राजगृह आणि मिथिला ह्या त्यांच्या अनुक्रमें राजधान्या होत्या. त्यांच्या मानानें शुद्धोदनाची राजधानी कपिलवस्तु म्हणजे लहानसें व कोपऱ्यांतील शहर म्हटलें पाहिजे. पण शुद्धोदनाच्या उदार आश्रयामुळें, काशीच्या उत्तरेकडे सुमारें शंभर मैलांवर असलेल्या ह्या शहराकडे, शास्त्री, पंडित, कलावंत ह्यांचा अखंड लोंढा सुरू असे. आसपासचा नऊशें चौरस मैलांचा मुलूख आणि सुमारें पांच लक्ष प्रजा ह्या शाक्य राज्यांत समाविष्ट होती. रोहिणी ही ह्या प्रदेशांतील मुख्य नदी. गंगाही जवळच होती.

खिस्ताब्दपूर्व सहाव्या शतकांत आर्य व मंगोलियनांनीं हिमालयाच्या पायथ्याशीं ठाण मांडलें. तेथून पुढें ते गंगेच्या खोऱ्यांत उतरले. नद्यांच्या

प्रवाहांना धरूनच संस्कृतीचे प्रवाहही पसरले. शाक्य व लिच्छवी वंश हे मूळचे मंगोलियन असावेत असें कांहीं इतिहासज्ञांचें मत आहे. सिद्धार्थाची निश्चित जन्मतारीख कोणती ह्याबद्दलही मतभेद आहेत. सामान्यत: खिस्ताब्द-पूर्व ६२४ मध्यें त्याचा जन्म झाला असावा. नेपाळतराईतील लुम्बिणी वन हें त्याचें जन्मस्थान मानलें जातें. अनेक वर्षें हें स्थानही अज्ञात होतें. सम्राट अशोकानें तें शोधून काढलें व खिस्तपूर्व २४४ सालीं तेथें एक स्तंभ उभारला. अद्याप हा स्तंभ अवशेषरूपानें आढळतो.

गेलीं पंचवीसशें वर्षें बुद्धाचें नांव ह्या देशांत गाजत आहे. वसुदेव-देवकीचें बाळ नंद-यशोदेच्या घरीं आलें व त्यांनीं तें वाढविलें. तसा सिद्धार्थानें प्रस्थापित केलेला बौद्ध धर्म आज भारताबाहेर आग्नेय आशियाई देशांत, तिबेटपासून जपानपर्यंत आणि दक्षिणेंत सिलोनमध्यें वाढत आहे. भारतांत सिद्धार्थाच्या जन्मापासून सुमारें बाराशें वर्षें बौद्धधर्माची पताका फडकत होती. बुद्धानें भारतांत नवें युग सुरू केलें असें मानण्यांत येतें. आजही त्या युगाचा प्रभाव जाणवतो. सिद्धार्थाचा बुद्ध कसा बनला? तो एक मननीय इतिहास आहे.






# अद्भुतरम्यतेचें वलय

थोर पुरुषांच्या चरित्राभोंवतीं चमत्कारांचें वलय निर्माण करण्यांत येतें. बौद्धधर्मग्रंथांतलें बुद्धाच्या जन्मप्रसंगींचें हें वर्णनच पाहा :

राणी माया पालखींतून माहेरीं चालली आहे. दिवस भरत आले होते. राणीला किंचित्‌ही त्रास होऊं नये म्हणून राजानें रस्ते साफ करविले. ठिकठिकाणीं विश्रामस्थानें उभारलीं. कोठलेंही वाईट दृश्य, कुरूप स्त्री-पुरुष, दुःखी दरिद्री प्राणी राणीच्या नजरेस पडूं नये म्हणून खास खबरदारी



हें नवजात बालक सेवकांच्या हातांतून निसटून समोर ताठ उभें राहिलें.

घेण्यांत आली. लुम्बिणी वनाजवळ आल्यावर राणीची पालखी थांबली. तें रम्य स्थान पाहून राणी हरखली. एका शाल वृक्षाखालीं बसली. राणीचा स्पर्श होतांच तो वृक्ष पर्णपुष्पांनीं बहरला. समोरच झुळझुळणाऱ्या झऱ्यांना आणखी पाणी आलें. वृक्षलता राणीस अभिवादन करण्यासाठीं वाकल्या. त्याच क्षणीं उभ्यानेंच राणीनें विनाकष्ट पुत्रास जन्म दिला. देवांनीं बालकावर पुष्पवृष्टि केली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे हें नवजात बालक सेवकांच्या हातांतून निसटून समोर ताठ उभें राहिलें. त्यानें चारही दिशांना कांहीं पावलें टाकलीं आणि अखिल विश्वाचें सम्यक् दर्शन घेतलें. त्यानंतर बालकानें हवेंत सात पावलें टाकलीं आणि घोषणा केली कीं, "हा माझा शेवटचा जन्म आहे." ह्या प्रसंगीं जगांतील सर्व रोगी, दु:खी, दीनदुबळे ह्यांचें दैन्य-दु:ख हरपून सर्वत्र आनंदीआनंद झाला.

राजाला पुत्रजन्माची वार्ता कळतांच तो लुम्बिणी वनांत आला. पुत्राच्या मुखावरील अद्भुत कांति पाहून तो चकित झाला. कपिलवस्तूला परत



पुत्राच्या मुखावरील अद्भुत कांति पाहून राजा चकित झाला.


येतांच त्यानें सर्व राजज्योतिष्यांना व शास्त्रीपंडितांना बोलावून पाठविलें. सर्वांनाच बालकाच्या तेजाचा विस्मय वाटला. असित नांवाच्या वृद्ध मुनीनें बालकांत थोर पुरुषाचीं सर्वच्या सर्व म्हणजे बत्तीस लक्षणें असल्याचें सांगितलें व स्वतः होऊन बालकास अभिवादन केलें. मुलाच्या चेहेऱ्याकडे पाहातां पाहातां असितमुनींच्या नेत्रांतून अश्रु ओघळूं लागले. तेव्हां राजा-राणी घाबरलीं. " महाराज, आपणांस कांहीं अशुभ तर कळलें नाहीं ना ? " राजानें भयभीत होऊन विचारलें.

" नाहीं शुद्धोदना, तूं असा घाबरूं नकोस. मी ह्या बालकाचें कांहीं अशुभ लक्षण पाहून रडत नसून स्वतःच्या दुर्भाग्याबद्दल दुःखी झालों आहें. तुझा पुत्र बुद्ध बनून ह्या जगाला आत्मोद्धाराचा नवा मार्ग दाखवील. पण मी त्या वेळीं हजर नसेन. हेंच माझें दुःख आहे. "

मुनींच्या ह्या उद्गारांनीं राजाराणीसह सर्वजण स्तिमित होऊन गेलीं. राणीनें आपल्या स्वप्नाचा वृत्तान्त सांगून त्या आश्चर्यांत आणखी भर घातली.



" नाहीं शुद्धोदना, तूं असा घाबरूं नकोस. "




# मायेस झालेला साक्षात्कार

एके दिवशीं रात्रीं राणी माया आपल्या महालाच्या खिडकींतून चांदण्याची शोभा पाहात बसली होती. वसंतांतील ती पौर्णिमा. समोर हिमगिरींची रांग आकाशगंगेप्रमाणें भासत होती. शुभ्रवसना रजनी सुगंध उधळीत होती. धवलगिरीवरून एक वायुलहरी आली आणि राणीच्या मुखावर परिमलाचा शिडकाव करून गेली. मायेच्या पापण्या जडावल्या. संवेदना बधिर झाल्या. हळूहळू तिच्या डोळ्यांसमोर

स्वप्न फुलूं लागलें. चार यक्षांनीं तिचा मंचक उंच अशा हिमशिखरावर नेऊन ठेवला. तेथेंच एक प्रचंड वृक्ष उभा होता. ह्या वृक्षास नाना रंगांचीं फुलें आलेलीं होतीं. चार अप्सरांनीं राणीला एका स्फटिकासमान सरोवराशीं नेलें. ह्या सरोवराचें उल्लोल स्वरूप पाहून राणी बावरली. पण राणीचा पदस्पर्श होतांच सरोवराचें पाणी अगदीं संथ झालें. त्या प्रशान्त जलाशयांत स्नान करतांच राणीची कांति निर्मल होऊन सुवर्णाप्रमाणें चमकूं लागली. त्यानंतर अप्सरांनीं दिलेलीं उंची वस्त्रें-आभरणें घालून राणी एका श्वेतमहालांत गेली. तेथें स्वर्गांतील नाना रंगांच्या व विविध गंधांच्या फुलांच्या शेजेवर ती पहुडली. राणीच्या समोरच एक सुवर्णगिरी होता. त्या सुवर्णगिरीवर हिमशुभ्र हत्ती फिरत होता. हत्तीच्या सोंडेंत एक विकसित चंद्रकमळ होतें. हा हत्ती डुलत डुलत राणीजवळ आला. त्यानें कमळानें राणीच्या उजव्या अंगावर अलगद प्रहार केला. त्याबरोबर हत्तीचें बाष्प होऊन लहानसा ढग तयार झाला. हा ढग राणीच्या उदरांत शिरला. राणीला जाग आली तेव्हां पहांट झाली होती. पक्षी चहक् चहक् करीत होते. पूर्वेकडे किंचित् लाली पसरली होती. दूरवर प्रार्थनेचे स्वर येत होते :

प्रातर्नमामि तमसः परमर्कवर्णम्,
पूर्णं सनातनपदं पुरुषोत्तमाख्यम् ।
यस्मिन्निदं जगदशेषमशेषमूर्तौ
रज्ज्वां भुजंगम इव प्रतिभासितं वै ॥

राणीनें आपल्या ह्या स्वप्नाचा रहस्यस्फोट करतांच दरबारांतील प्रत्येक शास्त्री, पंडित व ज्योतिषी त्याचा अर्थ लावूं लागले. सगळ्यांचें एकमत झालें कीं हें स्वप्न अति शुभसूचक असून राणीच्या पोटीं जन्मास आलेलें बाळ सामान्य नाहीं. कोणातरी महान विभूतीनें हा अवतार





... त्यानें कमळानें राणीच्या उजव्या अंगावर अलगद प्रहार केला.

धारण केला आहे. एका वृद्ध उपाध्यायांनीं सांगितलें कीं, " बालक एक तर चक्रवर्ति सम्राट बनेल किंवा जगदुद्धार करणारा बुद्ध बनेल. ह्या मुलानें एक म्हातारा, एक रोगी, एक प्रेत आणि एक योगी अशीं चार दृश्यें एकापाठोपाठ पाहिलीं तर तो सर्वसंगपरित्याग करून सत्याच्या शोधार्थ वनांत निघून जाईल. नाहींतर आसेतुहिमाचल सर्व देशांवर त्याचें राज्य पसरेल व तो दिग्विजयी वीर होईल. "

हें ऐकतांच शुद्धोधन विचारमग्न झाला. थोड्या वेळानें तो म्हणाला, " आम्ही क्षत्रिय आहोंत. वनापेक्षां रणांत जाण्याचीच आम्हांला अधिक आवड. माझा पुत्र चक्रवर्ति होईल. मी तसा त्याला बनवीन. "

संग्रहालय
अनुक्रम २८९
विभाग वा.वा.
क्रमांक ९०९
नों. दि. ३९१३






# अंतरींचें द्वंद्व

सिद्धार्थाच्या जन्माबरोबर कपिलवस्तूचा सर्वांगीण कायापालट झाला. निसर्गानें त्या खोऱ्यावर विशेष कृपा केली. भाताचें पीक अनेक पटींनीं वाढलें. फळांफुलांनीं बाजारपेठा फुलून गेल्या. राजपुत्राचा पायगुण म्हणून प्रजाजन धन्यवाद देऊं लागले. माया मात्र सिद्धार्थ सात दिवसांचा झाला नाहीं तोंच देवाघरीं निघून गेली. मृत्युसमयीं बाळास तिनें आपली बहीण व धाकटी राणी महाप्रजापति

गौतमी हिच्या पदरांत घातलें. तिनेंही सिद्धार्थास मायेच्या ममतेनें वाढविलें. राजानें त्यास ऐहिक दु:खांच्या झळांपासून दूर ठेवलें.


नेपाळ तराईच्या निळ्या आकाशाच्या छायेंत, हिमालयाच्या सान्निध्यांत, ओक, शाल, सुरू, देवदाराच्या गहिऱ्या वनराईंत, उतरणीवरील हिरव्या भातशेतांत व रोहिणी, अचरावती, इत्यादि नद्यानिर्झरांच्या प्रवाहाबरोबर सिद्धार्थाचें बालपण व्यतीत होत होतें. उन्हाळा आला कीं शंकराच्या जटांतून गंगौघ निघावेत तसे गिरीकंदरांतून हिमनद्यांचे ओहोळ वाहूं लागत. सूर्यकिरणांच्या शरांनीं हिमशिखरांचे अस्थिपंजर बनत. खोऱ्यांत नवें संगीत घुमत असे. वसंत येई नि सृष्टीच्या गालावर नवा रंग चढे. वर्षाऋतूंत सर्वत्र हिरवेंगार दिसे. हिंवाळ्यांत पुन्हा हिमवर्षाव सुरू झाला कीं सर्वत्र पांढरी रांगोळी काढली जाई. झाडांच्या पानांवर, घरांच्या छपरांवर, पर्वतांच्या शिखरांवर सर्वत्र बर्फच बर्फ दिसे. तांदळाच्या कण्यांसारखें, अभ्रकाच्या चुऱ्यासारखें, चिमण्या पिसांसारखें बर्फ अलगद येऊन बसत असे. सिद्धार्थ ह्या ऋतुचक्रांतून जात होता. मधूनच तो ध्यानमग्न होई आणि सृष्टीचें अंतिम रहस्य, जन्म-मृत्यूचें चक्र त्याच्यासमोर फिरूं लागे. संवगड्यांत खेळत असतांना मध्येंच डाव टाकून तो एकाकी निघून जाई. तासन् तास विचार करी. राजा आपल्यापरीनें सिद्धार्थास सर्व सुखें पुरवीत होता. तरीही सिद्धार्थ असा उदासीन कां राहातो हें त्याला कळेना !




संवगड्यांत खेळत असतांना मध्येंच डाव टाकून तो एकाकी निघून जाई.

स्वतः सिद्धार्थानेंच पुढें आपल्या शिष्यांना सांगितलें कीं माझें बालपण ऐहिकदृष्ट्या विलक्षण सुखांत गेलें. मी रेशमी वस्त्रें परिधान करीत असें. पंचपक्वान्नें खात असें. माझे चाकर माझ्या डोक्यावर सतत छत्री धरीत असत. ऊन, वारा नि सुखदु:खांचे चढउतार मला माहीत नव्हते. तरीसुद्धा माझ्या अंत:करणांत कोठेंतरी खोल दु:ख रुतून बसलें होतें.

सिद्धार्थ जसजसा मोठा होऊं लागला तसतसें त्याचें रूपही अधिक चमकूं लागलें. वेद, उपनिषदें ह्यांचा त्यानें अभ्यास केला. सिद्धार्थाचें ज्ञान व प्रतिभा पाहून गुरु विश्वामित्रही चकित झाले होते म्हणतात. मात्र विश्वामित्रांजवळही सिद्धार्थानें त्या वेळीं आपली मनोव्यथा बोलून दाखविली नाहीं. कदाचित् त्याला त्यासंबंधीं केवळ अबोध जाणीव असेल. सत्यसंशोधनाचा भुंगा नुकताच कोठें मन पोखरूं लागला असेल.





# शिव-शक्तीची भेट

सिद्धार्थाचें औदासीन्य घालविण्याच्या उद्देशानें, शुद्धोदनानें दरबार भरविला. शेकडों राजे, महाराजे, सरदार, जहागीरदार ह्यांना आपापल्या कन्यकांसह हजर राहाण्याचें निमंत्रण दिलें. सिद्धार्थास सोनेरी पिंजऱ्यांत अडकवून ठेवण्याचा त्यानें चंग बांधला.

तारकांनीं नभांगण झाकून टाकावें तसा देशोदेशींच्या सुंदर राजकन्यांनीं दरबार फुलून गेला होता. नाना रंगांचीं वस्त्रें, नाना गंधांचीं फुलें, नाना

वेषभूषा व केशभूषा, सौंदर्याचीं नाना रूपें ह्यांचें तें जणूं जिवंत प्रदर्शनच होतें. राजपुत्र सिद्धार्थाची कीर्ति सर्वांच्या कानीं गेलेली असल्यामुळें प्रत्येक राजकन्येच्या मनांत सुप्त आकांक्षेचा अंकुर पालवला होता.

दरबाराच्या मध्यभागीं, राजाच्या उजव्या हातास, एका सुवर्ण सिंहासनावर सिद्धार्थ बसला होता. त्याच्या कांतीच्या झळाळीनें रत्नांनाही लाज वाटली असावी. विशाल भाल, सरल नासिका, पाणीदार डोळे, कमळांच्या अर्धोन्मिलित कळ्यांप्रमाणें हात नि मधुर हास्य ह्यांमुळें सर्वांचें लक्ष त्या राजबिंड्यावर खिळलें होतें. समारंभ सुरू होतांच एकेक राजकन्या सिद्धार्थास सामोरी येऊं लागली. सिद्धार्थ कोणाकडेही मान उंचावून पाहात नसे. त्यानें दिलेली रत्नांची भेट थरथरत्या हातांनीं स्वीकारून प्रत्येक कन्या परत फिरत असे. त्याच्या दीप्तीनें त्या सर्वजणी झाकळून गेल्या. सर्वांत शेवटीं यशोधरा सामोरी आली. पारिजातकासारखी सुकुमार, चंद्रिकेप्रमाणें शीतल आणि अप्सरेप्रमाणें लावण्यवती अशा त्या राजदुहितेकडे सर्वजण टक लावून पाहूं लागले. मंद मंद पावलें टाकीत ती सिद्धार्थाच्या आसनाजवळ आली. सिद्धार्थाकडे तिनें अविचल व निर्भय दृष्टीनें पाहिलें. त्याच क्षणीं सिद्धार्थानेंही मान वर केली. अंतःकरणाला अंतःकरणाची खूण पटली.

यशोधरा एका महान् योद्ध्याची कन्या होती. मनांतल्या मनांत ती विचार करूं लागली : हा सुंदर राजपुत्र शूरही असेल काय? ह्याच्या नाजूक बाहूंत शत्रूचें निर्दालन करण्याचें सामर्थ्य असेल काय? ती कसोटी घेतल्याशिवाय तिच्या पित्यानें त्यांच्या विवाहास कधींही संमति दिली नसती.

यशोधरा सिद्धार्थाजवळ आली तेव्हां त्याच्या हातांतील सर्व रत्नें वांटलीं गेलीं होतीं. तो रिक्तहस्त होता. पण त्यानें यशोधरेला सर्वस्व अर्पण केलें



त्यानें आपल्या गळ्यांतील रत्नहार काढला व यशोधरेच्या मनगटास गुंडाळला.

होतें. केवळ औपचारिकता म्हणून त्यानें आपल्या गळ्यांतील रत्नहार काढला व यशोधरेच्या मनगटास गुंडाळला. सिद्धार्थानें आपली निवड जाहीर केली.

आतां यशोधरेच्या पित्याची पाळी होती. त्यानें आपल्या कन्येचें स्वयंवर रचलें. सर्वांत पराक्रमी धनुर्धरालाच यशोधरा वरील अशी त्यानें घोषणा केली. आपला नाजूक राजबिंडा कुमार इतर प्रतिस्पर्ध्यांपुढें कसा टिकेल ह्याची शुद्धोदनास चिंता वाटूं लागली. सिद्धार्थाचा यदाकदाचित् पराभव झाला तर.... ह्या विचारानें यशोधराही कंपित झाली. पण तिच्या अंतश्चक्षूंसमोर शिवधनुष्याचा सहज लीलेनें भंग करून रावणाचा गर्व हरण करणारी धनुर्धर रामाची गोजिरी मूर्ति उभी राहिली. सिद्धार्थ इतरांच्या मानानें लहान, पोरसवदा व सुकुमार वाटला तरी त्याचें तेज वेगळेंच आहे ह्याबद्दल तिची खात्री होती. तिनें त्याला मनोमन वरलें होतें. आणि आतां ती त्याच्या यशासाठीं प्रार्थना करीत होती.

एकामागून एक राजपुत्र आव्हान देऊन मैदानांत येऊं लागले. बाहुबलाचे झणत्कार, धनुष्याचे टणत्कार, शंखनाद व जयघोष ह्यांनीं वातावरण दुमदुमलें. पण सिद्धार्थ प्रशान्त सागराप्रमाणें संथ होता. आपल्या शुभ्र अश्वावर तो स्वार झाला तेव्हां सर्वांचे डोळे तिकडे वळले. रणांगणांत येतांच तो सूर्याप्रमाणें तळपला. अनेक राजपुत्रांनीं त्याच्यापुढें सलामीलाच हार खाल्ली. सिद्धार्थाचा चुलतभाऊ देवदत्त दांतओठ खात चाल करून आला. आपण हंसाला बाण मारला असतांना विव्हळणारा सिद्धार्थ आपल्यापुढें काय टिकाव धरील अशा शेखींत देवदत्त होता. पण सिद्धार्थानें पहिल्या बाणानेंच त्यास घोड्याच्या पायांशीं आणलें. शुद्धोदनाचा आनंद गगनांत मावेना. यशोधरेच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले.



सिद्धार्थानें पहिल्या बाणानेंच त्यास घोड्याच्या पायांशीं आणलें.

शस्त्रसामर्थ्याचा सामना संपतांच सिद्धार्थानें वाहनांचे चमत्कार करून दाखविले. त्याचा वारू कंथक जणूं वाऱ्याप्रमाणें धावत होता. रथाचें चाक जमिनीला स्पर्शही करीत नव्हतें. सहस्रावधि कंठांनीं सिद्धार्थाचा जयघोष केला.

सिद्धार्थ व यशोधरा विवाहासाठीं समोरासमोर येतांच लोकांच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. जणूं सूर्यचन्द्राची ती युति होती. युगानुयुगें परस्परांवर अनुरक्त असलेल्या शिवाची आणि शक्तीची ती भेट होती. विवाहप्रसंगीं सिद्धार्थ केवळ सोळा वर्षांचा व यशोधरा अवघी तेरा वर्षांची होती.



# गुलाबाचा कांटा

सिद्धार्थ-यशोधरेच परस्परावर उत्कट प्रेम होतें. सिद्धार्थाच्या हृदयांत स्त्रीचें मार्दव व कळ्यांचीं फुलें बनविण्याचा हळुवारपणा होता. उभयतांचा वेळ सुखांत कसा भुर्रकन् उडून जाई. यशोधरेला हें सुख बोचत असे. सिद्धार्थानें मधून मधून आपल्यावर रागवावें, आपल्याला कांहीं आज्ञा करावी, सेवेची संधि द्यावी, त्यानें खरोखर आपल्या स्वामीप्रमाणें वागावें असें तिला वाटे. पण सिद्धार्थ तिला केवळ प्रेम देत

असे. अपार प्रेम, विशुद्ध प्रेम. त्याच्या तोंडून कधींही वाईट शब्द, रागीट शब्द बाहेर पडत नसे. यशोधरेला तो जिवापलीकडे जपत असे, पण कित्येकदां तिला साफ विसरूनही जात असे. तिच्या प्रेमपाशांत राहूनही तो ताऱ्याप्रमाणें दूर आहेसें भासे. यशोधरेकडे पाहात असतांनाच त्याची नजर झुकून त्याच्या अंतर्यामीं वेगळेंच विश्व उमलत असे. सर्वार्थानें त्याची वृत्ति 'पद्मपत्रमिवाम्भसा' होती. कित्येकदा तासन् तास त्याला कशाचीही शुद्धि नसे. त्याचा आत्मा देहांतून निघून जणूं अंतराळांत भ्रमण करीत असे. बिचाऱ्या अजाण यशोधरेचें मन, आपलेंच कांहीं चुकलें म्हणून तर स्वारी रुसली नाहीं ना, अशा शंकेनें व्याकुळ होई. सिद्धार्थास आपल्या प्रेमाच्या, सौंदर्याच्या रेशमी धाग्यांनीं बांधण्याचा ती प्रयत्न करीत होती. पण तो मुक्तात्मा आहे हें तिला काय माहीत ?

कांहीं दिवस असेच गेले. नंतर मात्र सिद्धार्थ बदलला. तो यशोधरेजवळ अधिक काळ राहूं लागला. तिची आवड निवड पाहूं लागला. तिची पाकळीन् पाकळी खुलवूं लागला. दोघेंही हसत, उडत, बागडत होतीं. हसतां हसतां सृष्टि बदलत होती. यशोधराही बदलत होती. तिची तनुलता बहरत होती. तिच्या स्वप्नसृष्टींत नवनवे चमत्कार दिसत होते. सिद्धार्थाचें अस्तित्व तिला आतां स्वतांत जाणवत होतें. राजा शुद्धोदन व राणी महाप्रजापति हीं सुखांत निमग्न होतीं. अखेर एकदाचा हा मुक्त विहग पिंजऱ्यांत अडकलाच ह्याचा सर्वांना मनोमन आनंद झाला.

सिद्धार्थ आतां राज्यकारभाराकडेही अधिक लक्ष देत असे. न्यायदानाबाबत तो शुद्धोदनास साहाय्य करूं लागला. राजाचा बराच भार हलका झाला. आपला मुलगा आतां धुंदींतून बाहेर आला, तोच आपली गादी सांभाळील आणि चक्रवर्ति होईल अशा विचारांत राजा असतांनाच एक दिवस ह्या गुलाबी विश्वांतील कांटा त्याच्या हाताला बोंचला.

एक दिवस सिद्धार्थ सहज राजाकडे गेला व शहरांतून फेरफटका करण्याची त्यानें इच्छा प्रदर्शित केली. राजाला आतां तशी परवानगी देण्यांत कांहीं धोका वाटत नव्हता. कारण त्याच्या मतें सिद्धार्थ संसारांत चांगलाच रमला होता. शुद्धोदनानें आनंदानें संमति दिली. सर्व कपिलवस्तु नगरी स्वच्छ आणि सुशोभित करण्यांत आली. सिद्धार्थाच्या नजरेस कोठलेंहीं दु:ख, दैन्य पडूं नये म्हणून केवळ किंमती वस्त्रें परिधान केलेल्या तरुण-तरुणींनींच रस्त्यांवर यावें, हसावें, नाचावें असा राजानें हुकूम केला. दुसऱ्या दिवशीं आपला खास सारथी छंदक ह्यास सूचना देऊन राजानें सिद्धार्थास नगरांत पाठविलें. सिद्धार्थाचा सुवर्ण रथ रस्त्यानें जात असतांना लोक त्यावर पुष्पवृष्टि करीत होते. स्वागत-गीतें, जयघोष ह्यांनीं आकाश निनादलें होतें. प्रजाजनांचा तो आनंद पाहून सिद्धार्थही आनंदला. तो मनाशीं म्हणाला, " खरोखरच जग किती सुंदर आहे ! किती सुखी आहे !! " त्याचे हे मनांतील उद्गार मनांत विरत नाहींत तोंच, कोठून कोणास ठाऊक, एक जराजर्जर वृद्ध त्याच्यासमोर आला. काळानें त्याच्या शरीरावर आपले घाव उमटविले होते. अंगावरील लक्तरांच्या चिंध्या झाल्या होत्या. चालतांना हातपाय कांपत होते. मान नन्ना म्हणत होती. काठी टेकीत टेकीत तो कसाबसा पुढें जात होता. तापलेल्या काचेवर पाण्याचा थेंब पडून ती तडकावी तसें सर्वांचें सुखद स्वप्न भंग पावलें.

" छंदका, माणसें कित्येकदा इतकीं कुरूप व घृणास्पद असतात काय ? " सिद्धार्थानें बालसुलभ जिज्ञासेनें विचारलें.

छंदक थरथरला. गोंधळला. काय उत्तर द्यावें हें त्याला सुचेना. एखाद्या दैवी शक्तीनेंच त्याला बोलण्यास भाग पाडलें असावें. राजा शुद्धोदनानें महत्प्रयासानें जीवनाची काळी बाजू सिद्धार्थापासून लपवून ठेवली होती. आज तें अंग सिद्धार्थापुढें साक्षात् उभें राहिलें.



एक जराजर्जर वृद्ध काठी टेकीत कसाबसा पुढें जात होता.

कदाचित् हीसुद्धा दैवी शक्ति असेल आणि वृद्धाचें रूप घेऊन सिद्धार्थास सत्यज्ञान करून देण्यासाठीं अवतरली असेल असें वाटून छंदक उत्तरला, "राजकुमार, तो एक वृद्ध गृहस्थ आहे. तरुणपणीं तोसुद्धा सुंदर होता."

**सिद्धार्थ :** म्हणजे सर्वच माणसें अशीं वृद्ध आणि कुरूप होतात?

**छंदक :** होय महाराज ! सर्वांची हीच गत होते.

**सिद्धार्थ :** तर मग छंदका, जीवन नुसतेंच सुंदर नाहीं. मला ह्यांत कांहीं आनंद वाटत नाहीं. चल, रथ परत फिरव.

सिद्धार्थाचा रथ राजवाड्यांत आला तेव्हां छंदक अधोमुख बनला होता. सूर्य ढगांआढ गेल्यानें भर दुपारींही अंधःकार पसरला होता. सिद्धार्थाचें मुख काळवंडलें होतें. तो एकटाच महालांत निघून गेला. तेथें बराच वेळ विचारमग्न अवस्थेंत बसून राहिला. राजा शुद्धोदन, राणी महाप्रजापति व यशोधरा ह्यांना नगरफेरींतील त्या प्रसंगाची हकीकत कळतांच

अतिशय वाईट वाटलें. राजा घाईघाईनें पुत्राजवळ आला व त्याची समजूत घालूं लागला. पण सिद्धार्थाच्या अंत:करणांत खोलवर जखम झाली होती. त्याच्या हृदयवीणेची तार तुटली होती. हर्ष मावळला होता. तो कोणाशींही बोलला नाहीं कीं जागेवरून हलला नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सिद्धार्थास पुन्हा नगरांत नेण्यांत आलें. ह्या वेळीं विशेष खबरदारी घेतली होती. पण व्हायचें तेंच झालें ! लागोपाठ एक रोगी, एक प्रेत आणि एक योगी सिद्धार्थासमोरून गेले.








लागोपाठ एक रोगी, एक प्रेत आणि एक योगी सिद्धार्थासमोरून गेले.


" छंदका, प्रत्येकाला मरण येतेंच काय ?" सिद्धार्थानें विचारलें.

" होय राजपुत्र, जो जो जन्माला आला त्याचा मृत्यु ठरलेलाच असतो." छंदक उत्तरला.

सिद्धार्थाच्या अंत:करणास आणखी एक जखम झाली. घरीं आल्यानंतर पित्यावर उभ्या आयुष्यांत प्रथमच तो रागावला. " तुम्हीं मला खोट्या विश्वांत ठेवलें. माझ्याभोवतीं नकली सुखाच्या तटबंद्या उभ्या केल्या. जीवन म्हणजे सुख, सौंदर्य, यौवन असें मला वाटूं लागलें होतें. पण तें केवळ मृगजळ होतें. आतां मला जीवनाच्या दोन्ही बाजू कळल्या. मी स्वत: शाश्वत सुखाचा नि सत्याचा शोध घेणार." सिद्धार्थ कडाडला. त्याच्या डोळ्यांत दाहक अंगार होता. सिद्धार्थाचें हें नवें रूप पाहून राजाचा थरकांप झाला. त्याला राजज्योतिष्याचें भविष्य आठवलें.



" तुम्हीं ... माझ्याभोवतीं नकली सुखाच्या तटबंद्या उभ्या केल्या.!"



# बंधनांतील मुक्तात्मा

राजवाड्यांत आनंदी आनंद पसरला आहे, संगीताचे सूर घुमत आहेत, नर्तिकांचे नुपूर वाजत आहेत, अत्तरांचा सुवास दरवळत आहे, मंदिरांतून घंटानाद होत आहे, शंख, भेरी, तुताऱ्यांनीं आकाश निनादलें आहे, महालांतील मोठमोठ्या हंड्या–झुंबरांच्या प्रकाशानें ताऱ्यांना लाजविलें आहे, सृष्टीवर जणूं स्वर्ग अवतरला आहे. सर्वांच्या तोंडीं एकच विषय आहे. राजपुत्र सिद्धार्थास पुत्ररत्न झालें.

राजा, राणी, प्रधान व प्रजाजन सर्वांनाच अतिशय आनंद झाला होता. यशोधरेच्या मुखमंडलावर समाधान विलसत होतें. पण सिद्धार्थ ? तो बागेंतील वृक्षांच्या अंधारांत एकाकी फेऱ्या घालीत होता. त्याच्या अंतर्यामींचा संघर्ष अधिक तीव्र बनला होता. सेवकानें जेव्हां मोठ्या हर्षानें पुत्रप्राप्तीची वार्ता त्यास सांगितली, तेव्हांच त्याच्या अंतर्विश्वाचा दरवाजा खाडकन् उघडला गेला. अंत:करणाच्या गाभाऱ्यांतून प्रतिसाद घुमला : "हें आणखी एक बंधन मला तोडलें पाहिजे."



सिद्धार्थ बागेंतील वृक्षांच्या अंधारांत एकाकी फेऱ्या घालीत होता.


सिद्धार्थानें तेथल्या तेथें सेवकांस आज्ञा केली कीं मुलाचें नांव राहुल ठेवा. त्यानंतर बराच वेळ तो स्वत:शीं 'राहुल, राहुल, मुक्ति, मुक्ति' असें पुटपुटत होता, तळमळत होता.

रात्र ओसरून पहाटेचा गार वारा वाहूं लागला. वातावरणांत जागृति येऊं लागली. प्रसन्नतेला पंख फुटले. पानें फुलें दहिंवरलीं. सिद्धार्थाच्या मनांतील संघर्ष संपला होता. रात्रीच्या वादळाचा मागमूसही त्याच्या चेहेऱ्यावर दिसत नव्हता. हृदयांत उषेची प्रभा फाकली होती. मनाचा निश्चय झालेला होता. डोळ्यांत आगळें तेज आलें होतें. सकाळ होतांच तो राजाकडे गेला. पुत्राच्या चेहेऱ्यावरील प्रसन्नता पाहातांच शुद्धोदनास

आनंद झाला. "बाळ सिद्धार्था, काळजीचे ढग गेलेले दिसतात." पित्यानें ममतेनें विचारलें.

"होय पिताजी, चिंतेचे, दुःखाचे, खेदाचे ढग गेले आहेत. आतां माझ्यासमोर स्वच्छ सूर्यप्रकाश पसरला आहे. माझा मार्ग मला सापडला आहे. वनांत जाऊन माझें तें हरपलेलें श्रेय, माझ्या मनांतील टोचणीचें तें कारण शोधण्याची माझी इच्छा आहे. मला आशीर्वाद द्या! माझें मन सुखदुःखापलीकडील शांतीसाठीं, स्वर्ग-पृथ्वी-नरकापलीकडील अमरत्वासाठीं, शाश्वत सत्यासाठीं आसुसलेलें आहे. मला आपल्या ह्या राज्याचा, येथील भोगविलासांचा मोह नाहीं. येथें राहूनही मी वाळवंटांतील माशाप्रमाणें तडफडत आहें. पिताजी, तुमचा असतांनाच मी तुमचा नाहीं. अंतर्द्वंद्वानें मी विद्ध झालों आहें. आपली व स्वतःचीही मी घोर वंचना करीत आहें. मला जाऊं द्या!"

पुत्राच्या ह्या उद्गारांनीं शुद्धोदनावर जणुं वीज कोसळली. त्याच्या सर्वांगास कांपरें भरलें. "येथून जा, पुन्हा हा विषय काढूं नको." एवढेंच तो कसेंबसें बोलला नि मटकन् मंचकावर बसला. सिद्धार्थ खरोखरच रानांत निघून जाणार काय? तो आमच्या सर्व आशा-आकांक्षांचा चक्काचूर करणार काय? क्षत्रियकुलोत्पन्न हा राजपुत्र भगवीं वस्त्रें धारण करणारा योगी बनणार काय? सिद्धार्थ! सिद्धार्थ!! राजाच्या अंतःकरणानें टाहो फोडला. ते शब्द मंद मंद होत अंतराळांत विलीन झाले. सर्वत्र शून्यता पसरली.



# निद्रेंतून जागृतीकडे

पित्याच्या आज्ञेप्रमाणें सिद्धार्थ जड पावलांनीं आपल्या महालाकडे परतला. पित्यावर कमालीचें प्रेम असतांनाच त्यास दुःखी करण्याचा प्रसंग यावा ह्याचें सिद्धार्थास वाईट वाटलें. स्वतःपेक्षांही प्रबळ अशी गूढ शक्ति त्याला नव्या मार्गावर लोटीत होती. त्यानंतर एका रात्रीची गोष्ट. झुंबरांतील ज्योति मालवल्या होत्या. नर्तक-नर्तिका विसावल्या होत्या. बाळ राहुलला कुशींत घेऊन यशोधरा सुखस्वप्नें पाहात पाहात निद्राधीन झाली होती.



सिद्धार्थ अनिमिष नेत्रांनीं आपल्या प्रियेकडे आणि पुत्राकडे पाहात होता.

बाळाच्या चेहेऱ्यावर हर्षखेदाच्या लाटा येत होत्या. थरथरणाऱ्या दिव्याच्या प्रकाशांत तो मधूनच हसतांना दिसे तर मधूनच त्याचा चेहेरा रडवा होई. यशोधरेचें श्वासस्पंदनही जोरांत सुरू होतें. तिला अशुभ स्वप्नें तर पडत नसतील? सिद्धार्थ अनिमिष नेत्रांनीं आपल्या प्रियेकडे आणि पुत्राकडे पाहात होता. मधूनच त्याचें एक मन उसळी मारून येई. तो स्वतःलाच विचारी : आपल्या सर्वस्वाची शिवामूठ तुझ्या चरणीं वाहाणाऱ्या प्रेमळ पत्नीस सोडून सिद्धार्था, तूं वनांत जाणार काय? आणि त्या नवजात बालकानें कोणाच्या तोंडाकडे पाहावें? सिद्धार्थाचा निश्चय ढासळूं लागे. अवयवांचे सांधे निखळून एकाद्या मातीच्या ढिगाऱ्याप्रमाणें आपण खालीं बसत आहोंत

असें त्याला वाटे. पत्नीस जागें करून आपल्या मनांतील संघर्ष सांगावा, पुत्रास पोटाशीं लावून अश्रु ढाळावे असे त्याच्या मनांत येई. आपण त्यांना फसवीत आहोंत हा विचार त्याचें मन कुरतडीत असे. जावें न जावें, ह्या विचारांत तो बराच वेळ बसून राहिला. मग त्याची नजर समोरच्या दिवाणखान्याकडे वळली. तेथें त्याचे दास, दासी, नर्तक व कलावंत अस्ताव्यस्त पडले होते. त्यांचीं विकृत शरीरें व झोपेमुळें विद्रुप झालेले चेहेरे पाहून सिद्धार्थाचा संसारत्यागाचा निश्चय पुन्हा बळावूं लागला. प्रखर दिव्यांच्या प्रकाशांत वस्त्राभरणांच्या झगमगाटांत हेच देह सौंदर्याचे पुतळे वाटूं लागतात. पण तात्पुरत्या निद्रेंतही त्यांचें खरें स्वरूप प्रकट होतें. मृत्यूनें तर इहलोकींच्या तकलादी सौंदर्याचा सर्व बहर झाडला जातो. क्षणापूर्वीं ऐश्वर्यशिखरावर असलेला मनुष्यदेह मातींत मिळतो. आपण जन्ममृत्यूचें हें दुष्ट चक्र भेदून पलीकडे गेलें पाहिजे. शाश्वत सुखाचा नि सत्याचा मार्ग इतरांनाही दर्शविला पाहिजे; अशा प्रकारचे विचारतरंग त्याच्या मनांत उठूं लागले. तो आतां प्रियेला आणि पुत्राला विसरला. त्याच्या अंत:करणांतील मायापाश तटातट तुटत होते. एकाद्या तीरासारखा तो महालांतून बाहेर पडला. उंबरठ्यांत त्याचे पाय थबकले नाहींत. नेत्रांच्या कडा ओलावल्या नाहींत. सापानें जितक्या सहजतेनें कात टाकावी, पिलें जितकें विनासायास अंड्याबाहेर यावें, तितक्या सहजतेनें त्यानें आपलें संसारकवच टाकून दिलें होतें.


सिद्धार्थ तात्बडतोब तबेल्याकडे गेला. त्याच्या हलक्या आवाजानें-देखील इमानी सारथी छंदक जागा झाला. "कोण राजपुत्र! ह्या भयाण रात्रीं तूं एकटा येथें कां आलास? तुझ्या मनांत कांहीं भलतें सलतें नाहीं ना?" सारथ्यानें भयभीत होऊन विचारलें.

" मित्रा छंदका, तूं लवकर कंथकास तयार कर. ह्या क्षणीं मी तुला कांहींही सांगणार नाहीं. एकदा माझ्या डोळ्यांकडे पाहा म्हणजे तुला सर्व कांहीं बोध होईल. " सिद्धार्थानें उत्तर दिलें.

छंदकानें सिद्धार्थाकडे पाहिलें, तेव्हां त्याच्या विशाल नेत्रांत वडवानल पेटला असल्याचा त्याला भास झाला. त्या वडवानलाच्या ज्वालांनीं सर्व सृष्टि भस्मसात् होईल कीं काय असें त्याला वाटलें. पण दुसऱ्याच क्षणीं त्याला अमृतवृष्टि होत असल्यासारखेंही दिसलें. एकाद्या झपाटलेल्या माणसा-प्रमाणें छंदक स्वारीची सिद्धता करूं लागला. कंथकासदुद्धां सर्व कांहीं समजलें असावें. कारण तो न खिंकाळतां तयार झाला. सिद्धार्थास घेऊन रथ अरण्याच्या दिशेनें भरधाव निघाला. सर्व नागरिक कालनिद्रेंत असतांनाच विश्वाच्या गर्भांत ही क्रांति होत होती. नगरीबाहेर येतांच आपल्या राजधानीकडे व राजवाड्याकडे वळून सिद्धार्थ स्वतःशीं म्हणाला, " वृद्धावस्था, रोगराई व मृत्यु ह्यांच्यावर विजय मिळविल्याखेरीज मी इकडे परतणार नाहीं."

तो निद्रेकडून जागृतीकडे चालला होता.





# शाश्वत सुखासाठीं

अरण्याच्या सीमेवर येतांच सिद्धार्थानें छंदकाचा निरोप घेतला. छंदकाचें मन भरून आलें. सिद्धार्थाच्या पायांवर त्यानें मस्तक ठेवलें. सिद्धार्थाचे चरण त्याच्या अश्रूंनीं धुऊन निघाले. “ हे राजपुत्रा, ज्या माता-पित्यांनीं तुझ्यांत आपल्या मनोरथांची सिद्धि पाहिली त्यांच्यासाठीं तरी तूं परत चल. तुझ्या वियोगानें तुझ्या पत्नीस काय वाटेल ? तुझ्या नवजात अर्भकास तुझ्या छायेची आवश्यकता आहे. ” छंदक कळवळून बोलत होता.



ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम २८९...
विभाग ...
क्रमांक ७०५
नों. दि. ३९/...

सिद्धार्थ क्षणभर स्तब्ध राहिला. नंतर म्हणाला, " छंदका, तूं केवळ माझा सारथी नाहींस तर मित्रही आहेस. माझी मनोव्यथा मी तुला सांगूं शकलों असतों तर मलाही हलकें वाटलें असतें. पण मी काय करूं ? तुला कसें सांगूं ? मित्रा, प्रत्येकाच्या आयुष्यांत असा एकदा प्रसंग येतोच कीं जेव्हां माणूस आपल्या सर्व प्रियजनांचा, घरादाराचा त्याग करून निघून जातो. मृत्यु कोणासही माफ करीत नाहीं. तेव्हां जें शाश्वत नाहीं, जें मुळांतच आपलें नाहीं, जें केव्हांतरी सोडावें लागणारच, त्याचा स्वेच्छेनेंच त्याग कां करूं नये ? तूं माझ्या मातापित्यास व पत्नीस सांग कीं जें माझ्याजवळून कुणीही हिरावून नेणार नाहीं अशा शाश्वताच्या शोधार्थ मी निघालों आहें. त्यांचे अश्रु तूं पूस ! "

सिद्धार्थानें आपला रत्नजडित हार छंदकाच्या गळ्यांत घातला. कंथकाच्या पाठीवरून हात फिरविला. स्वामीच्या स्पर्शानें त्या इमानी घोड्याचें सर्वांग शहारलें. त्याच्याही डोळ्यांत पाणी चमकलें. सिद्धार्थानें म्यानांतून आपली तलवार काढली आणि स्वतःचे रेशमी कुंतल कापून त्या बटा छंदकाच्या हातांत दिल्या. त्या हृदयद्रावक प्रसंगांतील गांभीर्य कमी करण्यासाठीं सिद्धार्थ विनोदानें म्हणाला, " संन्याशाला असे मखमली केस शोभत नाहींत. खरं किनई ? "

मग त्यानें आपली तलवार हवेंत फेकली. " मी जर बुद्ध होणार असेन तर ही तलवार हवेंतच तरंगत राहो." असें त्यानें म्हणतांच तलवार हवेंत तरंगत राहिली.



सिद्धार्थानें आपला रत्नजडित हार छंदकाच्या गळ्यांत घातला.

छंदक सिद्धार्थाचे दागिने आणि केसांच्या बटा घेऊन मोठ्या

दुःखानें घराकडे परतला. सिद्धार्थानें एका भिकाऱ्यास आपलीं भरजरी वस्त्रें दिलीं व त्याचीं फाटकीं वस्त्रें स्वतः घातलीं. त्या निर्जन अरण्यांत तो पुढें चालला.




सिद्धार्थानें एका भिकाऱ्यास आपलीं भरजरी वस्त्रें दिलीं.

संसारत्यागाच्या वेळीं सिद्धार्थाचें वय केवळ एकोणतीस वर्षांचें होतें नि राहुल एक वर्षाचाही झाला नव्हता.

इकडे महालांत यशोधरेला मधेंच जाग आली व तिनें सिद्धार्थाच्या मंचकाकडे पाहिलें. मंचकावरील बिछान्यास स्पर्शही झालेला दिसला नाहीं. महालांत तिनें सभोवतालीं पाहिलें पण सिद्धार्थ दिसला नाहीं. ती बागेकडे धावली. प्रत्येक झाडन् झाड, लता-कुंज तिनें तपासले. पण सिद्धार्थ तेथें नव्हता. तिचें हृदय बुडूं लागलें. वाचा बंद झाली. ती मूर्च्छित होऊन पडली. राजा-राणीस हें कळतांच तींदेखील घाईघाईनें आलीं. राजानें सर्व दिशांना सेवक पाठविले. थोड्या वेळानें अधोमुख छंदक आंत आला आणि त्यानें सर्व हकीकत सांगितली. राजा शुद्धोदन धरणीवर पडला. राणी धाय मोकलून रडूं लागली. यशोधरेच्या डोळ्यांतील अश्रु आटले. अखिल कपिलवस्तु नगरीवर दुःखाची छाया पसरली.

यशोधरेनें सिद्धार्थाचे मुलायम कुंतल हृदयाशीं कवटाळले. आपले सर्व दागदागिने व किंमती वस्त्रें, इत्यादि साहित्य तिनें फेकून दिलें. "माझ्या स्वामींप्रमाणें मीसुद्धा संन्यासीव्रत स्वीकारीन, आजपासून मी जमिनीवर झोपेन. पक्वान्नांना स्पर्श करणार नाहीं." तिनें प्रतिज्ञा केली. आतां दिवसांतून ती केवळ एकदाच जेवत असे. व्रतवैकल्यें, भक्ति, पतीचें चिंतन आणि पुत्राचें लालनपालन ह्यांतच तिचा सर्व काळ जात होता.



# आश्रमांत आगमन

सिद्धार्थ बरेच दिवस व बऱ्याच रात्री अखंड चालत होता. प्रवासांतील कष्टानें त्याची काया पालटून गेली होती. प्रखर उन्हानें सुंदर तनु भाजली होती. कांटे, दगड-गोटे ह्यांनीं पाय फाटून त्यांतून रक्त बाहेर येत होतें. भुकेनें पोटांत आग पेटली होती. तहानेनें प्राण कासावीस झाला होता. समोर एक लहानसा ओहोळ दिसतांच तो पाणी पिण्यासाठीं धावला. पण झऱ्याजवळच धाडकन् आपटला. त्याच्या अंगांत उठण्याचें त्राण नव्हतें.



सिद्धार्थ झऱ्याजवळच धाडकन् आपटला.

समोर पाणी दिसत असतांनाच आपण पाण्यावांचून मरणार कीं काय असें त्याला वाटूं लागलें.

सिद्धार्थाचा निश्चय मोडण्यासाठीं मार नांवाच्या दुष्ट शक्तीनें ही संधि साधली आणि आपल्या मायाजाळाचा मारा सुरू केला असें बौद्ध ग्रंथांत म्हटलें आहे. प्रथमतः मारानें आपल्या मधुर आवाजानें सिद्धार्थाच्या मनांत गतजीवनांतील सुखविलासांच्या स्मृति जागविल्या. मार सिद्धार्थाच्या कानांत कुजबुजला, " हे वेड्या राजपुत्रा! परत फीर. संन्यासी होणें तुला शोभत नाहीं. तूं वीर आहेस. तुझें राज्य मोठें आहे. तूं चक्रवर्ति सम्राट होशील. जगावर न्यायाचें व शांततेचें साम्राज्य पसरविण्याचें सोडून तूं ह्या रानांत मृत्युमुखीं कां पडत आहेस?"

सिद्धार्थानें माराचा डाव ओळखला आणि त्याच्या बोलण्याकडे लक्षच दिलें नाहीं. तेव्हां मार चालता झाला. सिद्धार्थानें निश्चयाचें बळ एकवटून पुन्हा वाट धरली. आतां तो राजगृहाच्या आसमंतांत आला होता. ह्या प्रदेशांत अलार कालम नांवाचे प्रसिद्ध ऋषि राहात होते. त्यांच्या आश्रमांत अनेक शिष्य होते. सिद्धार्थानें ह्या आश्रमांत प्रवेश मिळविला. आश्रमांतील

यमनियम फार कडक होते. सर्व जण कंदमुळें भक्षण करीत व जमिनीवर झोपत असत. मुनींनीं सिद्धार्थास वेद, उपनिषदें आणि अन्य तत्त्वज्ञानें सांगितलीं. श्रद्धा, ध्यान, सदाचार, चिंतन ह्यांचें महत्त्व त्यांनीं सिद्धार्थाच्या मनावर ठसविलें. पण सिद्धार्थाच्या अंतर्यामींची खळबळ शांत झाली नाहीं. त्याच्या मनांतील प्रश्नांना उत्तरें मिळालीं नाहींत. कस्तुरी मृगाप्रमाणें त्याची अवस्था झाली होती. सुगंध स्वत:जवळच असतांना तो वणवण भटकत होता. पुढें तो उद्दक रामपुत्र नामक दुसऱ्या मुनींजवळ गेला. त्यांच्या आश्रमांत त्यानें कांहीं दिवस काढले. पण मन:शांति लाभली नाहीं.

ह्या आश्रमांत असतांना सिद्धार्थ शिष्य गौतम ह्या नांवानें ओळखला जाऊं लागला. एके दिवशीं गौतम अन्य शिष्यगणांसह गांवांत भिक्षा मागण्यासाठीं गेला. त्याचें राजबिंडें रूप पाहून तरुणींनीं अभिलाषायुक्त नजरेनें त्याला भिक्षा घातली. एकीनें त्याला ऐकूं जाईल इतक्या जोरानें उद्गार काढले, " किती भाग्यवान असेल ह्याची पत्नी, किती भाग्यवान



त्याचें राजबिंडें रूप पाहून तरुणींनीं अभिलाषायुक्त नजरेनें त्याला भिक्षा घातली.

ह्याचे मातापिता ! प्रत्येकास हवाहवासा वाटणारा हा तरुण कोण असेल बरें ? " गौतम भिक्षा न घेतांच परतला.

गौतम पुन्हा एके दिवशीं असाच नगरांत गेला असतांना राजाकडून भेटावयास येण्याचा त्याला निरोप आला. "मी एक मुनी शिष्य आहें, मी तुमच्या राजाला भेटून काय करूं ?" गौतमानें राजदूताला सांगितलें. दूतानें राजास हें सांगतांच स्वतः तो गौतमास भेटण्यास आला. गौतमाचें गोंडस रूप, तारुण्य आणि प्रज्ञा पाहून राजा बिंबसार थक्क झाला. त्याच्या मनांत वात्सल्य जागृत झालें. "हे कुमारा, तूं ह्या तापसी जीवनाचा कां स्वीकार केलास ? मला पुत्र नाहीं. तूं मलाच पिता मानून माझ्याबरोबर चल. माझ्या राज्याचा वारस होशील. "


गौतम गालांतल्या गालांत हसला आणि नम्रपणें उत्तरला, "महाराज, माझ्यावर आपण जो अनुग्रह केलात त्याबद्दल आभार. पण मी एक राजकुमारच आहें. माझे वडील कपिलवस्तूचे सम्राट आहेत. घरचें राज्य सोडून निघालेला मी आपला कुमार कसा बनेन ? "

**बिंबसार :** तूं हें वैराग्य कां पत्करलेंस ? तुला काय दुःख आहे ?

**गौतम :** महाराज, तेंच तर मी शोधीत आहें. मला राज्य नको. सुखविलास नकोत. मी शाश्वत सुखाचा शोध करीत आहें.

**बिंबसार :** राजपुत्रा, तुझ्या प्रयत्नांना यश येवो. तुला शाश्वत सुखाचा मार्ग सापडल्यानंतर तूं एकदा अवश्य इकडे ये ! माझ्या राज्याचीं द्वारें तुझ्यासाठीं सदैव खुलीं आहेत. मगध देशास तुझ्या स्वागताचा लाभ मिळो हीच माझी इच्छा आहे.

गौतमानें राजास तसें वचन दिलें. पुढें कालांतरानें त्यानें उद्दक आश्रमही सोडला.



# प्रखर देहदंडानंतरही प्रकाश नाहीं!

मगध देशांत बराच काळ भटकल्यानंतर गौतम आपल्या पांच सहकाऱ्यांसह उरुवेल नामक स्थानीं आला. तीच आजची बुद्ध गया. हें स्थान अति रम्य होतें. तपोवन म्हणून त्याची ख्याति होती. तेथें एक प्रकारची स्थिरता व शांति होती. इंद्रियें व वासना प्रक्षुब्ध होतील असें तेथें कांहींही नव्हतें. रानावनांतील कंद भक्षण करून व निर्झरांचें पाणी पिऊन ऋषि मुनी तेथें तप करीत होते.

गौतमानें त्या घनदाट अरण्यांत आपल्या मनाजोगतें एक स्थान निवडलें. “ मी आतां कठोर तप आचरणार, माझ्या शरीराच्या सर्व गरजा, सर्व वेदना व वासना मारून टाकणार, कदाचित् त्यामुळेंच माझ्या अंतरात्म्याचें तेज वाढून मला हवें असलेलें शाश्वत सुख मिळूं शकेल. ” असा गौतमानें विचार केला.

गौतमानें अनशन सुरू केलें. मौन पाळलें. बसण्यासाठीं कांट्यांचें आसन घेतलें. शरीरास किंचितही सुख लाभूं नये म्हणून सर्व बाजूंनीं कांट्यांचे ढीग रचले. गौतमानें सहा वर्षें अशा प्रकारें अति कठोर देहदंड व तप केलें. एक दिवस तर ग्लानि येऊन त्याचा प्राण निघून गेला कीं काय असें बरोबरीच्यांना वाटलें. स्वत: गौतमानें ह्या आपल्या उग्र तपाविषयीं पुढें शिष्यांना सांगितलें, “ इंद्रियांचें दमन करण्यासाठीं व हृदयांतील सर्व विकार जाळून टाकण्यासाठीं मीं कडक व्रत आरंभलें. माझें पोट पाठीस लागलें होतें. शरीरांत किंचितही त्राण उरलें नव्हतें. हाडांवर कातडी सुरकतून बसली होती. केसांच्या मुळाशीं कांहींच ओलावा न उरल्यानें हात लावतांच ते गळून पडत होते. मधून मधून ग्लानि येऊन प्राण जाईलसें वाटे. पण भिक्षूंनो, एवढें कठोर तपाचरण करूनही मला प्रकाशाचा एकही किरण दिसला नाहीं. शेवटीं उपासतापास व देहदंड हा कांहीं ज्ञानप्राप्तीचा खरा मार्ग नव्हे अशी माझी खात्री पटली. ”

गौतम अशा प्रकारें गलितगात्र झाला असतांना त्यास तारुण्यांतील ध्यानस्थ अवस्थेचा एक प्रसंग आठवला. आपल्या कठोर तपाच्या स्थानापासून गौतम दुसरीकडे जाण्याचा प्रयत्न करूं लागला. पण पायांत अजिबात शक्ति नसल्यानें पांच-दहा पावलें जातो न जातो तोंच खालीं पडला. सरपटत जाऊन त्यानें एका झाडाच्या बुंध्याचा आश्रय घेतला. तेथें तो जवळ जवळ बेशुद्ध अवस्थेंत कांहीं वेळ पडून होता.

गौतमाच्या जीवनांत अशी आणीबाणीची वेळ आली असतांना व त्याचा प्राण जीवनमृत्यूच्या सीमेवर हेलकावे खात असतांना मार वगैरे षड्रिपूंनीं त्यावर पुन्हा हल्ला चढविला. त्याला भयभीत करण्याचा, मोह पाडण्याचा प्रयत्न केला. पण गौतमाच्या प्रज्ञेवर अभ्रपटल आलें नव्हतें. त्याचा मनोनिर्धार कायमच होता. तो स्वत:शींच विचार करूं लागला : माझा शोध वृथा नाहीं ह्याबद्दल माझी आतां अधिकाधिक खात्री पटत आहे. जगांतील ह्या सर्व दृश्य बदलांमागें आणि विनाशामागें कांहीं शाश्वत तत्त्वें आहेत. माणसाची प्रवृत्ति वा आत्मा ह्या शाश्वताचाच अंश आहे. मला त्याचा शोध घेतलाच पाहिजे. पण त्याचबरोबर गेलीं सहा वर्षें मी जो मार्ग अवलंबीत होतों तो कांहीं त्या शोधाचा खरा मार्ग नव्हे ! अनेक लोक पुढें स्वर्गांत सुखें मिळावींत म्हणून ह्या जन्मीं कठोर तपानें देहास शासन करतात. पण माझ्या मतें पृथ्वीप्रमाणेंच स्वर्ग वा नरक हींसुद्धा शाश्वत नाहींत. मला स्वर्गसुखाचा मोह नाहीं. मला त्याही पलीकडे जावयाचें आहे.


ह्याच वनाच्या जवळपास सुजाता नांवाची एक गोपकन्या राहात होती. मनाप्रमाणें पति लाभल्यास दरवर्षी १००० गाईंच्या दुधावर पोसलेल्या १०० गाईंच्या दुधाचा नैवेद्य वनदेवतेला अर्पण करीन असा तिनें नवस केला होता. सुजाताची मनीषा पूर्ण झाली. मनाजोगता पति लाभला. पुत्रपौत्रांनीं घर भरून गेलें. दरवर्षीं नियमानें ती ह्या अरण्यांत येऊन एका वृक्षाखालीं आपला नैवेद्य ठेवून जात असे. ह्या वर्षींही ती आली. तिच्या नेहमींच्या वृक्षाच्या बुंध्याशीं एक मनुष्याकृति बसलेली पाहून ती थबकली. वृक्षाचा प्राणच तर मनुष्यरूप घेऊन आला नाहीं ना, अशी तिला शंका आली. सुजातानें मनाचा हिय्या केला व आपला नैवेद्य त्या मनुष्याकृतीपुढें ठेवून नमस्कार केला. गौतम भुकेनें व्याकुळ



सुजातानें मनाचा हिय्या केला व आपला नैवेद्य त्या मनुष्याकृतीपुढें ठेवून नमस्कार केला.

झालेला होता. मनानेंही विनाकारण देहदंड करण्यांत अर्थ नाहीं असा कौल दिला होता. त्यानें सुजाताचा नैवेद्य भक्षण केला व समोरच वाहात असलेल्या प्रवाहांत तें पात्र भिरकावून तो ओरडला, "मी जर बुद्ध होणार असेन तर हें पात्र प्रवाहाच्या उलट दिशेनें तरंगत जावो." तें खरोखरच प्रवाहाच्या उलट्या दिशेनें गेलें म्हणतात.

सहा वर्षांच्या कठोर तपानंतर गौतमानें पुन्हा अन्नभक्षण केलें म्हणून त्याच्या पांच सहकाऱ्यांचा त्याच्यावरील विश्वास उडाला. गौतमाला दूषणें देत ते निघून गेले. गौतमानें सुजाताचे मनापासून आभार मानले. थोडी शक्ति येतांच तो तेथून पुढें निघाला.



# बोध-प्राप्ति

फिरत फिरत गौतम नीरांजरा नदीच्या किनारीं आला. ( आतां ह्या नदीस फाल्गु म्हणतात. ) तेथें एका वृक्षाच्या छायेखालीं त्यानें आसन मांडलें. आसपासचें वातावरण मोठें प्रसन्न होतें. गौतम ध्यानस्थ झाला. त्याची ही समाधि भंगावी म्हणून मारानें त्याच्यावर अग्नि, प्रस्तर, शस्त्रास्त्रें ह्यांचा वर्षाव केला. गौतम जागचा हलला नाहीं. अखेर मारानें आपल्या तीन सुंदर कन्यांना गौतमास मोह पाडण्याच्या कामगिरीवर

पाठविलें. त्यांनीं आपल्या उत्तान सौंदर्याची सर्व किमया पणास लावली. पण गौतमानें त्यांच्याकडे ढुंकूनही पाहिलें नाहीं. तेव्हां एकीनें अधिकच लगट करण्याचा प्रयत्न केला. गौतमानें केवळ क्षणभर रागानें त्यांच्याकडे पाहिलें आणि त्यांचें सर्व सौंदर्य नष्ट होऊन त्या कुरूप वृद्धा बनल्या. अखेर त्या गौतमास शरण आल्यावर त्यांचें रूप त्यांना परत मिळालें. अशा प्रकारें माराचा संपूर्ण पराभव झाला.

बौद्ध ग्रंथांतून मार व त्याच्या ह्या सर्व कारस्थानांचा वारंवार उल्लेख सापडतो. मार हें वास्तव अर्थानें आपल्या मनांतील षड्रिपूंचेंच प्रतीक आहे. त्याचे हल्ले म्हणजे गौतमाच्या मनांतील अशांति, अस्थिरता वा संघर्ष होय ! पुढें गौतमानें स्वदेहावर व मनावर संपूर्ण ताबा मिळवितांच माराचा पराभव झाला. समाधीसाठीं मनाची ही समावस्था अतिशय आवश्यक मानली जाते. त्यानंतर कोठलाही मनोव्यत्यय न येतां अखंड ध्यानधारा स्रवते. गौतम ह्या अवस्थेप्रत आला होता.

गौतमाच्या मनांतील संघर्ष संपतांच जुन्या श्रद्धा झडून नव्या निर्माण झाल्या. ध्यानाच्या चार अवस्थांतून गेल्यावर त्याला विशुद्ध आत्मप्राप्ति झाली. सर्वप्रथम त्याच्या डोळ्यांसमोर त्याच्या गतजन्मांचें चक्र फिरूं लागलें. कोणकोणत्या जन्मांतून तो कसाकसा गेला व ह्या बुद्ध होण्याच्या अवस्थेप्रत कसा पोहोंचला हें त्याला स्पष्ट दिसलें. 'करतलामलकवत्' त्यानें स्वतःला पाहिलें. त्याच्या मनाला ह्यामुळें शांति लाभली. प्रत्येक माणूस आपलें केवळ चालू जन्मींचें आणि त्यांतही चालू घडीचें जीवन पाहात असतो. पण गौतमापुढें आतां त्याचा सम्यक् जीवनपट पसरलेला होता. माणूस ह्या जन्मीं जीं सत्कृत्यें वा दुष्कृत्यें करतो त्यामुळेंच त्याचा भावी जन्म ठरतो. तेव्हां प्रत्येक माणूस ह्या दृष्टीनें आपापल्या भवितव्याचा नियंता आहे. तसेंच माणसाची कृति ही त्याच्या विचारांची निष्पत्ति असते व विचारांचा उगम मनांतून

होत असतो. तेव्हां मन स्थिर असणें ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट होय हें कोडें गौतमाला उलगडलें.


त्याच्या चिंतनाचा तो पन्नासावा दिवस होता. प्रहर रात्र उलटतांच त्याच्या दिव्य चक्षूंसमोर त्रिखंडाचें रहस्य उलगडलें. स्वर्ग, पृथ्वी व पाताळ ह्या तिन्ही लोकांत त्यानें डोकावून पाहिलें. स्वर्गाच्या सुखानें त्याला मोह झाला नाहीं किंवा दुष्टांना पाताळांतील नरकवासाची शिक्षा देणें त्याला आवडलें नाहीं. पृथ्वीवर सर्व प्राण्यांची कसोटी घेतली जाते व ज्याच्या त्याच्या पापपुण्याच्या ठेव्यानुसार त्याला स्वर्गांत वा पाताळांत जागा मिळते




देवादिकांनीं बुद्धपरंपरेंतील ह्या चौथ्या बुद्धावर पुष्पवृष्टि केली.

हें त्याच्या अनुभवास आलें. पण स्वर्ग वा पाताळ ह्यासुद्धा चिरंतन किंवा शाश्वत अवस्था नाहींत. तेथूनही सारखी अदलाबदल होतच असते. तेव्हां स्वर्गापलीकडे कांहींतरी शाश्वत असलें पाहिजे असा त्यानें कयास बांधला. मनोमन त्यानें त्या अवस्थेस निर्वाण अशी संज्ञा दिली.

आतां रात्रीचा तिसरा प्रहर सुरू होता. सर्व चराचर सृष्टीवर स्तब्धता पसरली होती. अशा प्रशान्त वेळीं त्याच्या अंतःकरणांत ज्ञानज्योत पेटली. गौतमाला बोध झाला. ते बुद्ध बनले. शाश्वत सत्याचें त्यांना दर्शन झालें. त्यांच्या सर्व आशंका फिटल्या. सर्व समस्या सुटल्या. पूर्वेकडे उषःकालाची प्रभा फाकत होती. त्यानंतर सात दिवसपर्यंत बुद्ध ध्यानस्थ अवस्थेंत त्या झाडाखालींच बसून होते. त्यांच्या ज्ञानप्राप्तीनें पृथ्वीला आनंद झाला. देवादिकांनीं बुद्ध परंपरेंतील ह्या चौथ्या बुद्धावर पुष्पवृष्टि केली. बोधप्राप्तीच्या वेळीं बुद्धांचें वय अवघें पस्तीस वर्षांचें होतें. त्यांच्या ज्ञानप्राप्तीचा दिवस वैशाख पौर्णिमा हा मानतात. बुद्धांस ज्या झाडाखालीं ज्ञानप्राप्ति झाली तें झाड बुद्धगया (बिहार) येथें अद्याप उभें आहे. ह्या बोधिवृक्षांत आपल्या अंकुरांतून पुन्हा वृक्षरूप धारण करण्याचा गुण आहे असें मानलें जातें. बोधिवृक्ष म्हणजे पिंपळ.





# तृष्णेपासून मुक्त

आपल्या ज्ञानप्राप्तीच्या प्रसंगाबद्दल स्वतः बुद्धांनीं म्हटलें आहे : "माझ्या मनोक्षितिजावर जेव्हां ज्ञानाची प्रभा फाकली तेव्हां माझें मन तृष्णेपासून मुक्त होत आहे, पुनर्जन्माच्या चक्रांतून सुटत आहे, अज्ञानांधःकारांतून पलीकडे गेलें आहे आणि ध्येयसिद्धि झाली आहे असा माझा मला विश्वास वाटूं लागला. तृष्णा ही सर्व विकारांचें, सर्व रोगांचें व सर्व दुःखांचें मूळ आहे. ही तृष्णा कशी नष्ट करावी, विकारांचें जाळें कसें

तोडावें हें जाणणारा जगांत माझ्याशिवाय कोणीही नाहीं असें मला वाटूं लागलें. मृत्यूकडून अमरत्वाकडे, अस्थिर व अशाश्वताकडून स्थिर व शाश्वताकडे जाण्याचा मार्ग मला सापडला होता. ”

स्वत:ला झालेलें ज्ञान इतरांना उपलब्ध करून द्यावें कीं नाहीं ह्याचा बुद्ध विचार करीत होते. तेव्हां स्वतः ब्रह्मानें त्यांना जगाला ‘धम्म’ (धर्म) शिकविण्याची विनंती केली असें बौद्धग्रंथ सांगतात. बुद्धाचा निश्चय झाला नव्हता तोंपर्यंत पृथ्वी कांपत होती, देव चिंताग्रस्त झाले होते, असें ह्या ग्रंथांत म्हटलें आहे. अखेर बुद्धांच्या, अंत:करणांत करुणा निर्माण झाली. जगावर अनुग्रह करण्याचा त्यांनीं निर्णय घेतला. ह्या जगांत राहूनच नवा धर्म शिकविण्याचें ठरविलें.

“ जगाच्या अंध:कारांत मी ज्ञानाचा ढोल वाजवीत आहें. ज्यांना कान असतील त्यांनीं नवी श्रद्धा दाखवावी. ” अशी घोषणा करून बुद्धांनीं परिभ्रमण सुरू केलें. धर्मचक्रप्रवर्तनास सुरुवात झाली. येशू ख्रिस्तानें लोकांना सांगितलें, “ मी देवाचा पुत्र, तुम्ही माझ्या मागून या.” सॉक्रेटिस, शंकराचार्य, इत्यादि सर्व धर्मप्रवर्तकांमध्यें व तत्त्वज्ञांमध्यें हाच आत्मविश्वास आढळून येतो. त्या सर्वांआधीं बुद्ध ह्याच आत्मविश्वासानें जगापुढें उभे राहिले.

सुरुवातीस कोणास शिकवावें असा त्यांना प्रश्न पडला. त्यांचे पांच सहकारी आधींच रागानें निघून गेले होते. पूर्वींचे गुरु अलार कालम् आणि उद्दक देवाघरीं गेले होते. अखेर काशीजवळील सारनाथ ह्या तपोवनांत बुद्धास आपले पांच जुने सहकारी भेटले. प्रथमतः बुद्धाशीं बोलायचें नाहीं असें त्यांनीं ठरविलें होतें. पण बुद्ध जवळ येतांच ते चुंबकाप्रमाणें त्याच्याकडे आकर्षिले गेले. बुद्धास ज्ञानप्राप्ति झाली आहे असा त्यांना मनोमन साक्षात्कार झाला. चेहेऱ्यावरील समाधानाच्या तेजानें

ते पांचही जण स्तिमित होऊन लीन बनले. विनम्रपणें त्यांनीं बुद्धाचे पाय धरले.

सारनाथची तपोभूमि त्या काळीं विशेष ख्यातनाम होती. ह्या भूमींत प्राणीहत्येस मनाई होती. भरतभूमींतील अनेक ऋषींचे व मुनींचे तेथें आश्रम होते. ह्या पावन जागीं बुद्धानें आपलें पहिलें प्रवचन दिलें. त्या दिवशीं आषाढी पौर्णिमा होती.


सुदैवानें बुद्धाच्या त्या पहिल्या ऐतिहासिक प्रवचनाचा आशय उपलब्ध आहे. त्यांत अति साधें सूत्र होतें. ज्यांना धर्ममय जीवन जगावयाचें आहे त्यांनीं मर्यादाबद्ध जीवन जगलें पाहिजे. अति सर्वत्र वर्ज्य! अति देहदंड वा अति भोग, दोन्हीही सारखेच त्याज्य. ह्यासाठींच बुद्धांनीं 'मध्यमा प्रतिपद्' किंवा मध्यमार्गाचा पुरस्कार केला. मानवी तृष्णा ही सर्व दु:खांचें मूळ कारण असल्यामुळें ती नष्ट करण्यासाठीं त्यांनीं आठ नीतिपदें, अष्टांग मार्ग किंवा आठ पायऱ्या सांगितल्या. ही सम्यक् दृष्टि, सम्यक् वाणी, सम्यक् प्रयत्न आदि आठ नीतितत्त्वें हें बुद्धांच्या शिकवणीचें खरें सार आहे. पहिल्या प्रवचनानंतर बुद्धांना सारनाथलाच साठ शिष्य लाभले. त्यांचा आवडता शिष्य आनंदही त्यांतच होता. आनंद म्हणजे बुद्धदेवांची जणूं सांवली. तो सदैव त्यांच्याबरोबर असे.



ह्या पावन जागीं बुद्धानें आपलें पहिलें प्रवचन दिलें.

पुढें पुढें बुद्धांना अनेक शिष्य येऊन मिळाले. वैदिक धर्मातील यज्ञयाग, वर्णभेद, रूढी, परंपरा, इत्यादिविरुद्ध त्यांनीं प्रत्यक्षांत बंड पुकारलें हें खरेंच. पण बौद्धधर्म हा ब्राह्मणद्वेष्टा पंथ नव्हता. त्यांच्या शिष्यगणांतील सारिपुत्त व मोगल्लन् हे सर्वोत्तम शिष्य ब्राह्मण होते. आनंद, देवदत्त, इत्यादि क्षत्रिय होते. तपसा व भल्लिक ह्यांच्यासारखे वैश्य होते. उपालीसारखे शूद्र होते. एके काळीं बुद्धांजवळ ११३ ब्राह्मण, ६० क्षत्रिय, ५२ मंत्री, सरदारादि मानकरी, ७ जमीनदार, ९ सूत, १० गुलाम वा मजूर, ३ मुलें, ३ बेवारशी अर्भकें आणि १ नट असल्याची नोंद सापडते. ह्यावरून बौद्ध पंथानें जात-पात-वर्ण-व्यवसायादि भेदाभेदाविरुद्ध पताका फडकाविली होती हेंच सिद्ध होतें. अनेक इतिहासज्ञांच्या मतें ती खरीखुरी लोकशाही चळवळ होती. ज्ञानाची मक्तेदारी न करतां ज्ञानभांडार सर्वांना खुलें करण्याचा तो एक जाणीवपूर्वक प्रयत्न होता. सर्वत्र माजलेल्या हिंसेला व अनाचाराला त्यामुळें पायबंद बसून इतिहासास नवें वळण मिळालें. त्या काळीं यज्ञांत गाईंचासुद्धा बळी देत असत असे उल्लेख सापडतात.





# बहुजनहिताय बहुजनसुखाय

वर्षा ऋतु सुरू झाला. बुद्धांनीं परत उरुवेला येथें जाण्याचें ठरविलें. तत्पूर्वीं आपल्या शिष्यांना त्यांनीं जवळ बोलावून सांगितलें: " हे भिक्षूंनो, आतां तुम्ही बहुजनहिताय बहुजनसुखाय येथून बाहेर पडा. सर्वत्र हिंडा. जगाविषयीं नितान्त सहानुभूति व करुणा बाळगून मानवांच्या कल्याणार्थ प्रयत्न करा. सर्वजण एकाच दिशेस जाऊं नका. प्रत्येकानें वेगवेगळ्या भागांत जावें. ज्या शिकवणीचा आरंभ, मध्य व अन्त सारखाच

दिव्य आहे ती शिकवण जगाला द्या. पवित्र, विशुद्ध व निर्दोष जीवनाचा उद्‌घोष करा. चला, भ्रमन्ति सुरू करा."

प्रारंभीं प्रारंभीं स्वतः बुद्ध "एही भिकु" (हे भिक्षु ये!) असें म्हणून नवागतास संघांत घेत असत. आतां त्यांचे शिष्य सर्वत्र फिरणार होते तेव्हां त्यांनीं नवीन शिष्यांना संघांत घेण्याचा मार्ग सांगितला. कोठल्याही नव्या इसमास "बुद्धं सरणं गच्छामि, संघं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि" ही त्रिसूत्री तीनदा उच्चारल्यावर संघांत प्रवेश मिळत असे.


बुद्ध उरुवेलास निघाले. रस्त्यांत त्यांना एके ठिकाणीं कांहीं तरुण-तरुणी क्रीडा करतांना आढळलीं. एकानें आपल्याबरोबर आपली पत्नी नसलेल्या परक्या स्त्रीस आणलें होतें. त्या स्त्रीनें इतर सर्वांचे कपडे आणि साहित्य घेऊन पोबारा केला. तो तरुण तिला इकडे तिकडे शोधूं लागला. बुद्धांना पाहातांच त्यानें विचारलें, "महाराज, आपण कुणा स्त्रीस इकडून पळून जातांना पाहिलें काय?" बुद्ध किंचित् स्मित करून उत्तरले, "कां उगीच त्या स्त्रीचा शोध करतोस? तो वेळ स्वतःला शोधण्यांत खर्च कर ना?" तो तरुण हिरमुसला झाला. त्याच्या डोक्यांत लख्ख प्रकाश पडून त्यानें बुद्धांचे पाय धरले.

बुद्धांची बोलण्याची शैली बरीचशी प्रश्नोत्तररूप असे. छोटीं छोटीं वाक्यें. घरगुती उपमा दृष्टान्तांनीं भरलेलीं. नर्म विनोद, क्वचित् उपरोध ह्यांचाही ते वापर करीत. ब्रह्मज्ञानाच्या गुप्त मार्गाविषयीं अकारण रहस्यमय वातावरण निर्माण करणाऱ्यांची त्यांनीं अशीच उपहासानें भंबेरी उडविली. ते म्हणाले, "शिष्यांनो, ह्या जगांत केवळ तिघांजवळ गुप्तपणा असतो. स्त्रिया, भटभिक्षुकांचें ज्ञान व खोटें धर्ममत. परंतु जो बुद्ध झाला त्याचीं मतें सूर्यप्रकाशाप्रमाणें स्पष्ट व वाऱ्याप्रमाणें मोकळीं असतात." मृत्यूपूर्वी आनंदला त्यांनीं सांगितलें, "आनंद, मीं नेहमीं सत्याचा उपदेश केला.

**सारिपुत्त :** तसेंही म्हणतां येणार नाहीं भगवन्.

**बुद्ध :** मग सारिपुत्ता, तूं आधीं एवढें धाष्टर्याचें विधान कां केलेंस? भूत, भविष्य, वर्तमानाबद्दल आपणांस इतकी थोडी माहिती असतांना असलीं विधानें कां करावींत?

सारिपुत्त निरुत्तर झाला. अनुयायांशीं बुद्ध नेहमीं ह्या पद्धतीनें बोलत. त्यांना स्वत: मौलिकपणें विचार करायला लावीत. आपल्या अनुयायांच्या वैचारिक स्वातंत्र्यास ते जातीनें जपत असत. एखाद्यास गुरू मानून शिष्यांनीं सत्यसंशोधनाचें कार्य सोडून दिल्यास ते स्वत:चा व इतरांचा उद्धार करूं शकणार नाहींत असें त्यांना वाटे. 'महापरिनिब्बाण सूत्तांत' म्हटलें आहे, "आत्तदीप, आत्तसरण, अनन्नसरण, धम्मदीप, धम्मसरण" (ज्यांना आत्मा हाच दीप वाटतो, ज्यांना अन्य आधार नसून आत्मा हाच आधार वाटतो, असे आपण व्हा! सत्यधर्म हाच ज्यांचा दीप व सत्यधर्म हाच ज्यांचा आधार आहे, असे बना!) बुद्धांचा हाच मुख्य संदेश आहे.



संग्रहालय
विभाग ...
क्रमांक ... 9092
नों. दि. ...

सत्यांत गुप्त व प्रकट असे भेद नाहींत. तथागताजवळ (बुद्ध स्वतःला तथागत म्हणजे पूर्वीच्या बुद्धापाठोपाठ आलेला असें म्हणत) झाकली मूठ नाहीं."

"नाना तत्त्वज्ञानें, नाना दर्शनें व विचार ह्यांचा बुद्धिवादी दृष्टिकोनांतून विचार करा" असा उपदेश करतांना बुद्धांनीं सांगितलें : "तुमच्या समोर जे जे विचार मांडले जातील, जे जे मार्ग ठेवले जातील त्या सर्वांना तर्काची कसोटी लावा. केवळ एखाद्याविषयीं आपणांस आदर वाटतो म्हणून त्याचें मत स्वीकारूं नका. ऐकीव गोष्टींवर विश्वास ठेवूं नका. परंपरेनें चालत आलें आहे एवढ्याचसाठीं कांहींही मान्य करूं नका. एखादें वचन धर्मग्रंथांत आलें म्हणून ग्राह्य मानूं नका. माझ्या नांवाचा तुमच्या स्वतंत्र विचारशक्तींत व्यत्यय येऊं देऊं नका."

बुद्धांची ही वाणी त्यांच्या निर्विकार व चिकित्सक वृत्तीचीच साक्ष देते. एकदा त्यांचा आवडता शिष्य सारिपुत्त बुद्धांची प्रशंसा करून म्हणाला : "भगवन्, आपल्याहून मोठा ज्ञानवेत्ता पूर्वीं कधीं झाला नाहीं व पुढेंही कधीं होईल असें वाटत नाहीं."


त्यावर बुद्ध मिस्किलपणें हसले. सारिपुत्तास त्यांनीं विचारलें : "काय रे सारिपुत्ता, मागें होऊन गेलेले सर्व ज्ञानवेत्ते बुद्ध तुला माहीत आहेत नाहीं ?

**सारिपुत्त :** नाहीं महाराज.

**बुद्ध :** भविष्य काळांतील तरी तुला माहीत असतीलच !

**सारिपुत्त :** नाहीं महाराज.

**बुद्ध :** किमानपक्षीं माझ्या अंतर्मनांत तूं डोकावून पाहिलें असशील. मला तूं चांगला जाणतोस नाहीं ?



# दीन दुबळ्यांचा वाली

दीन, दुबळे, दु:खी, दरिद्री, शूद्र ह्यांचा सर्वच संतांनीं कैवार घेतलेला दिसून येतो. बुद्ध, शंकराचार्य, एकनाथ, चैतन्य, कबीर, तुकाराम, नानक, रामकृष्ण परमहंस किंवा महात्मा गांधी ह्यांच्या चरित्रावरून असें दिसून येतें कीं समाजांतील दीन-दु:खी लोकांशीं ते समरस झाले होते. आजारी माणूस दिसतांच बुद्ध आपल्या शिष्यास म्हणत कीं तुम्ही माझी जशी सेवा कराल तशी ह्या आजाऱ्याची करा. ते स्वत: दलितांना जवळ

करीत. एकदा रस्त्यानें त्यांना एक भंगी दिसला. भंग्यानें सर्वांना नमस्कार करण्याच्या सवयीप्रमाणें बुद्धांनाही नमस्कार केला. बुद्धांनीं मागचापुढचा विचार न करतां सहजस्फूर्तीनें त्याला 'एही भिकु' (भिक्षु ये!) म्हणून हाक मारली व त्याला संघांत घेतलें. एके ठिकाणीं बुद्ध म्हणतात: मी ब्राह्मण नाहीं, क्षत्रिय नाहीं, वैश्य नाहीं. मी जनतेच्या गोत्रांतील (म्हणजे सामान्य जनांपैकीं एक) आहें. माझ्याजवळ माझ्या मालकीचें कांहींही नाहीं. जन्मानें कोणीही ब्राह्मण नाहीं व जन्मानें कोणीही शूद्र नाहीं. जो तो आपापल्या कृत्यांनीं ब्राह्मण वा शूद्र बनतो.

शेतकरी, मेंढपाळ किंवा लोहार ह्यांच्याशीं बुद्धांचें जें बोलणें झालें आहे तें वाचून असें वाटूं लागतें कीं ते सर्वसामान्य जनतेशीं एकरूप बनले होते. त्यांच्यासारखा ज्ञानी, थोर पुरुष स्वतःला शेतकरी, मेंढपाळ किंवा लोहाराच्या ठायीं कल्पीत असे. ज्ञानप्राप्तीनंतर मार बुद्धांना म्हणाला, "तुम्ही आतां निर्वाणप्रत जा. तुम्हांला झालेल्या ज्ञानाचा प्रसार करीत हिंडण्याचें कारण नाहीं." बुद्ध त्याला स्पष्ट नकार देऊन सांगतात, "मला निर्वाण नको आहे. मी राष्ट्राराष्ट्रांतून फिरेन आणि सर्वसामान्य जनतेस ज्ञान देईन." माता एकुलत्या एक पुत्राची जशी काळजी घेते तद्वत्च आपण ह्या विश्वांतील सर्व प्राणीमात्रांवर प्रेम केलें पाहिजे अशी त्यांची शिकवण होती. त्यांतच ते ब्रह्मविहार असल्याचें मानीत. ब्रह्म, अध्यात्म, ज्ञान ह्यांच्या जडजंबालावर त्यांचा विश्वास नव्हता. विश्वावरील अगाध प्रेमामुळें व अंतरींच्या परम कारुण्यामुळें बुद्धांची वाणीसुद्धा अतिमधुर बनली होती. आपल्या वागण्या-बोलण्यामुळें कोणासही किंचितही दुःख होतां कामा नये ह्याकडे ते कटाक्षानें लक्ष देत असत. सारिपुत्तानें लिहिलें आहे कीं बुद्धांसारखा मधुभाषी पुरुष मीं कधीं पाहिला नाहीं कीं माझ्या ऐकिवांतही नाहीं. "वादानें माणसें दूर जातात. कठोर शब्दांनीं

बाणांपेक्षांही भयंकर जखमा होतात. युक्तिवादांतून टाळ्या मिळविण्यापलीकडे कांहींही निष्पन्न होत नाहीं. प्रेमानें सर्वांना जिंका." असें बुद्ध आपल्या शिष्यांना नेहमीं सांगत असत.

जगावर अशा प्रकारें निस्सीम प्रेम करायला सांगणाऱ्या बुद्धांनीं आपल्या कुटुंबीयांना दुःख कां द्यावें? गृहत्याग करून त्यांनीं मातापिता, पत्नी, पुत्र, मित्र ह्यांना मनस्ताप कां द्यावा, असा प्रश्न मनांत निर्माण होणें स्वाभाविक आहे. ह्याला स्वतः बुद्धांनीं उत्तर दिलें आहे. ते म्हणाले, "भिक्षूंनो, मी परिव्राजक किंवा श्रमण कां बनलों? घरांत राहाणें मला सहन होईनासें झालें, म्हणून बनलों. घर म्हणजे धुळीचें मूळस्थान. स्वार्थ, आशा-आकांक्षांची धूळ टाळण्यासाठीं मीं आकाशांत उड्डाण करावयाचें ठरविलें." दुसऱ्या एका प्रवचनांत ते म्हणतात, "एकाद्या लहानशा डबक्यांत मासे खूप झाले म्हणजे एकमेकांवर ते जसे हल्ले करतात तसे मानव मानवावर तुटून पडतांना पाहून मी वनांत निघून गेलों व खऱ्या सुखाचा शोध लावण्याचें ठरविलें." बुद्धांच्या काळचीं युद्धें, हिंसा, अराजक, अन्याय, इत्यादि परिस्थितीचें डोळ्यांसमोर चित्र उभें केल्यास त्यांचें हें कारण अधिक बरोबर वाटूं लागतें. वृद्धावस्था, रोग, मृत्यु, इत्यादि पाहून ते भयभीत झाले असते तर ज्ञानप्राप्तीनंतर परत त्याच जगांत एवढ्या प्रेमानें ते वावरले नसते. नगरींतून फिरतांना वृद्ध, रोगी, प्रेत व योगी हीं चार दृश्यें पाहिल्यामुळें सिद्धार्थ वनांत निघून गेला हें अतिरंजितच वाटतें.


गीता व बुद्ध ह्या दोघांनींही सर्वभूतीं समभाव आणि अपरिग्रह शिकविला. भिक्षूंनीं स्वतःची कांहींही मालमत्ता ठेवूं नये असा नियम होताच. बुद्ध सामान्य जनतेपासून राजे-महाराजांपर्यंत सर्वांना दान करावयास सांगत. मोठमोठे बुद्धविहार, मंदिरें, धर्मशाळा, कला व संस्कृतीचे नमुने ह्यांची उभारणी ह्यांतूनच झाली. एकदा त्यांना विचारण्यांत

आलें कीं "जीवनांत सर्वांत वाईट गोष्ट किंवा अपयश कोणतें ?" बुद्ध उत्तरले, "संपत्तीचा संचय ! ज्याच्याजवळ भरपूर धनधान्य असूनही जो एकटाच खातो, त्याच्या कृत्यासारखी वाईट गोष्ट दुसरी नाहीं. जीवनांतील तो सर्वांत मोठा पराभव होय !"

दुसऱ्यानें विचारलें, "जीवनांत सर्वांत चांगली गोष्ट किंवा मधुर रस कोणता ?"

बुद्ध : सत्य ! सत्य हाच वाणींतील मध व सत्य हाच धर्मांतील प्राण होय. त्यांतूनच विश्वप्रेमाचा उगम होतो.





# चमत्कारास स्थान नाहीं !

बौद्ध ग्रंथांतून बुद्धांच्या, स्पर्श करतांच रोग्यास रोगमुक्त करण्यापासून तों मृतास जिवंत करण्यापर्यंत, अनेक चमत्कारांचें वर्णन आहे. ख्रिस्त, शंकराचार्य व महंमद पैगंबर ह्यांच्याभोवतींही अशा चमत्कारांच्या मालिका गुंफण्यांत आल्या आहेत. पण स्वत: बुद्धांचा दृष्टिकोन संपूर्णतया बुद्धिवादी होता. आपणांस विश्वाचें कोडें उलगडलें असून ईश्वरीप्रेरणा व सत्ता प्राप्त झाली आहे असा आव त्यांनीं कधींच आणला नाहीं.

एकदा किशा गौतमी नांवाची एक स्त्री आपल्या मृत बालकाचें प्रेत घेऊन, आक्रोश करीत बुद्धांकडे आली. कांहींही करून माझ्या बाळाला पुन्हा जिवंत करा अशी तिनें बुद्धांची विनवणी केली. बुद्ध तिला शांतपणें म्हणाले, "बाई, ज्या घरीं अद्याप एकदाही मृत्यु आला नाहीं अशा घरून मला थोड्या मीठमोहऱ्या आणून द्या म्हणजे मी आपल्या बाळास जिवंत करतों." बाई खूप खूप हिंडली पण असें घर तिला सापडलें नाहीं. प्रत्येक घरीं केव्हां ना केव्हां मृत्यु येऊन गेलेला होताच. बाई मनांतल्या मनांत काय तें उमजली व तिनें बुद्धांचे पाय धरले.

आपल्या धर्माबद्दल वा तत्त्वज्ञानाबद्दलही बुद्धांनीं स्तोम माजविलें नाहीं. कोठलाही एकादा संप्रदाय स्वीकारला म्हणजे सत्यशोधनाची जबाबदारी नीट पार पाडतां येत नाहीं अशी त्यांची धारणा होती. "अंड्यांत असणाऱ्या पिलानें बाहेरच्या जगाविषयीं केलेल्या कल्पनांना जितकी किंमत देतां येईल तितकीच किंमत नाना उपपत्ति व मीमांसांना देतां येईल." असें त्यांनीं स्पष्टपणें सांगितलें. तेविज्जसूत्तांत बुद्ध म्हणतात, "धर्मोपदेशक ब्रह्मासंबंधीं बोलतात. पण ब्रह्माचें त्यांनीं कधीं दर्शनही घेतलेलें नसतें. महाल कोठें बांधावयाचा हें माहीत नसतांनाच एकाद्यानें सोपान बांधण्याची तयारी करावी, त्याप्रमाणेंच हें सर्व आहे."

बुद्ध स्वतःला तथागत म्हणवीत. तथागत म्हणजे बोले तैसा चाले वृत्तीचा किंवा पूर्वींच्या गुरूंचीच परंपरा चालविणारा. ह्यांत आपण स्वतः नवीन कांहींही सांगत नाहीं असेंच त्यांना दर्शवावयाचें होतें. "माझें खास असें तत्त्वज्ञान नाहीं. ठरीव सांच्याचें सत्य मला ठाऊक नाहीं." असें सॉक्रेटिसाचें म्हणणें होतें. ख्रिस्ताला ठराविक मतांचा तिटकारा होता. महात्मा गांधींनींसुद्धां गांधीवाद नांवाची कांहीं चीज नाहीं असें सांगितलें. सर्व थोर तत्त्वज्ञांचें असेंच आहे.

बुद्धांनीं आपल्या अनुयायांना अगदीं साधा नीतिमार्ग शिकविला. शिष्यांचे त्यांनीं दोन विभाग केले. एक विभाग भिक्षूंचा. ह्यांत सर्वसंग परित्याग करून आलेले लोक असत. त्यांच्यासाठीं त्यांनीं दहा नियम तयार केले होते. इतरांना संसारांत राहूनही अवलंबितां येईल असा अष्टविध मार्ग सांगितला. त्यांचीं बहुतेक प्रवचनें सामान्यजनांपुढेंच होत असत.

बुद्धांची कीर्ति चारही दिशांना पसरली. निरनिराळ्या सम्राटांकडून त्यांना बोलावणीं येऊं लागलीं. त्यांचें सर्वत्र परिभ्रमण सुरू होतें. सर्वत्र बुद्धांचा, संघाचा व धम्माचा जयजयकार सुरू होता.

महाभारतीय युद्धाच्या पौराणिक काळानंतर म्हणजे इन्द्रप्रस्थाच्या पांडवांचें प्रस्थ कमी झाल्यानंतर, भारतांत कोणीही नांव घेण्यासारखा सम्राट उरला नव्हता. लहान लहान प्रादेशिक राज्यें उदयास येत होतीं. तीं बहुतेक जात वा वंशवारच होतीं. बौद्धांच्या प्राचीन ग्रंथांतून अंग, मगध, काशी, कोशल, वृजि, मल्ल, चेदि, वत्स, कुरु, पांचाल, मत्स्य, शूरसेन, अश्वक, अवंतिक, गांधार आणि कंबोज अशा सोळा जातीच्या राज्यांचा उल्लेख आढळतो. जातक कथांतून शिवि, सौवीर, मद्र, विराट व उद्यान ह्यांचींही नांवें येतात. ह्या राज्याराज्यांत वारंवार युद्धें होत. वैचारिक क्षेत्रांतही अराजक माजलें होतें. पशुपक्ष्यांची पूजा, जादू-टोणा, मंत्रतंत्र, यज्ञयाग ह्यांना ऊत आला होता. पण अद्वैताकडे जाणारा एक प्रवाहही वाहात होता. बुद्धांनीं वैचारिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रांतील अराजक नष्ट केलें ही त्यांची फार मोठी कामगिरी म्हटली पाहिजे. राजाराजांमधील युद्धेंही त्यांनीं थांबविलीं. त्यासाठीं ते बिनतोड युक्तिवाद करीत. हें एक उदाहरण पाहा :

एकदा पाण्याच्या बांधावरून दोन राजांत घनघोर लढाई जुंपणार तोंच बुद्ध मध्यें आले. सर्वांना शस्त्रें कांहीं काळ खालीं ठेवण्याची त्यांनीं विनंती केली. नंतर उभय राजांना जवळ बोलावून बुद्धांनीं विचारलें,

" हे पराक्रमी राजांनो, मातीला स्वत:ची अशी कांहीं किंमत आहे काय ? "

राजांनीं उत्तर दिलें, " नाहीं ! "

**बुद्ध :** बरें, पाण्याला मोल आहे का ?

**राजे :** नाहीं महाराज.


**बुद्ध :** मानवाच्या रक्तास कांहीं किंमत आहे काय ?

**राजे :** रक्ताची किंमत खूपच आहे.

**बुद्ध :** मग हे राजांनो, ज्याला कांहींही किंमत नाहीं अशा मातीसाठीं व पाण्यासाठीं तुम्हीं बहुमोल रक्त कां सांडावें ?

राजांनीं लढाईचा प्रयत्न सोडून दिला.

बुद्धांनीं कृत, दृष्ट आणि उद्दिष्ट ह्या तिन्ही प्रकारच्या हिंसेचा निषेध केला होता. पण भिक्षेंत मांस मिळालें तर भक्षण करण्यास हरकत नाहीं अशी त्यांची शिकवण होती. ह्या मुद्द्यावर त्यांचा कांहीं शिष्यांशीं वादही झाला होता. प्रत्येक गोष्टीकडे बुद्धिवादी दृष्टिकोनांतून पाहाण्याच्या पद्धतीमुळेंच ते अहिंसा व मांसाहार ह्यांची संगति लावूं शकले.



# पिता-पुत्राची हृदयस्पर्शी भेट


आपल्या पुत्राच्या बोधप्राप्तीची वार्ता शुद्धोदनास कळतांच त्याला कमालीचा हर्ष झाला. बुद्धाची प्रभा सर्वत्र फाकत असलेली पाहून तो मनोमन आनंदला. त्याचें एक मन बुद्धास भेटण्यासाठीं ओढ घेई पण दुसरें मन दुखावलेल्या अहंकाराची व अपेक्षाभंगाची जाणीव करून देई. राणी महाप्रजापति राजास सारखा आग्रह करीत होती कीं बुद्धास आपल्या राज्यांत बोलावून त्याचें स्वागत करावें. यशोधरा मात्र कांहींही बोलत

नव्हती. राहुल आठ वर्षांचा झाला होता. तो धनुर्विद्या, वेद, उपनिषदें, शास्त्रें, पुराणें ह्यांचें शिक्षण घेत होता. आपल्या आईची संन्यस्त वृत्ति, बापाची गैरहजेरी ह्यांचा अर्थ त्याला कळत नव्हता. मधून मधून तो यशोधरेस नाना प्रश्न विचारी. "तुझे वडील महान जगदुद्धारक बुद्ध आहेत. ते आतां केवळ तुझे वडील नसून ह्या जगाचे पिता बनले आहेत." असें यशोधरा त्यास सांगत असे.


बुद्धास बोलावून आणण्यासाठीं राजा शुद्धोदनानें दूत पाठविला. तो बुद्धांकडे गेला. पण तेथें बुद्धांचें ज्योतिर्मय व्यक्तित्व पाहून व त्यांची वाणी ऐकून देहभान विसरला. असे एकापाठोपाठ अनेक सेवक राजानें पाठविले. पण ते बुद्धाजवळच राहून भिक्षु बनले. अखेर राजानें आपल्या प्रधानास पाठविलें. प्रधानाबरोबर राजानें निरोप दिला कीं, "बुद्धा, मी आतां म्हातारा झालों आहें. ह्या जगांतून निघून जाण्यापूर्वीं एकदा मला तुझें डोळे भरून दर्शन घेऊं दे!" प्रधान राजगृहास बुद्धविहारांत गेला आणि त्यानें बुद्धास राजाचा निरोप सांगितला. हा प्रधानही बुद्धशिष्य बनला. पण तो आपलें कर्तव्य न विसरतां बुद्धाचें मन वळवीत राहिला.

अखेर बुद्धानें सर्व भिक्षूंना कपिलवस्तूस निघण्याची आज्ञा केली. प्रधान पुढें निघाला. राजाराणी व प्रजाजनांना बुद्धागमनाची वार्ता समजतांच मोठा आनंद वाटला. स्वागताची तयारी सुरू झाली. सर्वत्र ध्वजपताका लावण्यांत आल्या. कांहीं दिवसांनीं बुद्ध आपल्या अनुयायांसह तेथें आले. राजानें सामोरे जाऊन सीमेवर त्यांचें स्वागत केलें. शुद्धोदन स्वपुत्रासमोर प्रथमच वाकला. त्याचें अंत:करण भरून आलें. डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. बुद्धांनीं पित्यास आलिंगन दिलें. बुद्धांच्या तेज:पुंज कांतीनें व दैवी सौंदर्यानें सर्वजण मुग्ध होऊन गेले.

पित्यानें पुत्रास नमन करावें हें कांहीं शाक्य सरदारांना व मानकऱ्यांना आवडलें नाहीं. बुद्धांनीं मनोमन हें ताडलें. क्षणांत त्यांनीं स्वर्गांत उड्डाण केलें व त्यांच्या शरीरांतून तेजस्वी अग्निशलाका बाहेर पडल्या. सरदारांचें गर्वहरण झालें. सिद्धार्थ शुद्धोदनाचा पुत्र खरा पण भगवान बुद्ध इतर सर्वांपेक्षां थोर व श्रेष्ठ आहेत ह्याबद्दल त्यांची खात्री पटली असें बौद्धग्रंथांत म्हटलें आहे.



शुद्धोदन स्वपुत्रासमोर प्रथमच वाकला.



क्षणांत त्यांनीं स्वर्गांत उड्डाण केलें...

पुत्रास पाहातांच राजा-राणींच्या मनांत अभिलाषा निर्माण होणें स्वाभाविकच होतें. राजाच्या तोंडून सहजोद्गार निघून गेले, " सिद्धार्था, आतां मला म्हातारपणीं कोण आधार देणार ? तूं हा संन्यासमार्ग स्वीकारण्याची काय गरज होती ? "

बुद्ध किंचित् थांबले. मग आपल्या मृदु स्वरांत म्हणाले, " महाराज, सर्व दु:खांचें मूळ तृष्णा आहे. तृष्णा म्हणजे जीवनाचा मोह. अज्ञान व तृष्णा ह्यांतून वासना जन्मास येतात. आत्मा वासनांचा दास बनतो. त्याला जर ह्या बंधनांतून मुक्त होतां आलें तर खचितच आनंद होईल. अज्ञानाचा व तृष्णेचा नाश अंतर्ज्ञानानें, सहजस्फूर्त दैवी ज्ञानानें होतो. सन्मार्गी मन, नीतिनियमानें चालणारें मन, जीं कांहीं चांगलीं कामें करूं शकेल तीं कामें आपल्यासाठीं आपले आईबाप किंवा निकटचे लोकसुद्धां करूं शकणार नाहींत. "

**राजा :** पण बुद्धा, तूं म्हणतोस ह्यासाठीं पुत्रानें मातापित्यांचा, पतीनें पत्नीचा त्याग करणें आवश्यक आहे काय ? त्यासाठीं अकर्मता अंगीं बाणावी काय ?


**बुद्ध :** महाराज, प्रेमानें हृदयाला मुक्त केलें पाहिजे. मोक्षसुख देणाऱ्या प्रेमांत सर्व सत्कर्मांचा समावेश होतो. प्रेम प्रकाशतें. तेज देतें. ज्याप्रमाणें

माता आपला प्राण धोक्यांत घालूनही एकुलत्या एक मुलाला जपते, त्याप्रमाणें मानवानें अखिल जगाविषयींचें प्रेम जोपासलें पाहिजे. प्रेमांत आपपर भाव नाहीं. माझ्या मातापित्यांवर मी जितकें प्रेम करतों तितकेंच मी सर्वांच्या मातापित्यांवर करतों. 'बुद्ध मुलांना आई-बापांपासून दूर नेतो, स्त्रियांना विधवा बनवितो व कुटुंबाचा ऱ्हास घडवून आणतो.' असें कांहीं लोक म्हणतात. पण जीवन संपवा, जीवनापासून पळून जा असें तथागतानें कधींच सांगितलें नाहीं. उलट समृद्ध जीवनाचा, उन्नत जीवनाचा मी मार्ग दर्शवीत आहें. मी अकर्मता शिकवीत नाहीं. कांहीं अनिष्ट करूं नका असें सांगत असतों.

महाराज, आपण ज्याला जीवन समजतां तें संपूर्ण जीवन नाहीं. तो एक जीवनांश आहे, सांखळींतील केवळ एक कडी आहे. हें जीवन म्हणजे एक दुवा किंवा पूल आहे. त्यावर घर बांधूं नका. हें जीवन म्हणजे नदी आहे. तिच्या किनाऱ्यास चिकटून राहाण्याचा प्रयत्न करूं नका. जीवन म्हणजे एक हंगामी खेळ आहे. त्यांतच रमून जाऊं नका किंवा त्याकडे दुर्लक्षही करूं नका. व्यायामशाळेप्रमाणें त्याचा मनाच्या तयारीसाठीं उपयोग करा. कारण ह्या सर्व दृश्यादृश्य गोष्टींमागें मनच आहे. ह्या मनाच्या तयारीवरच माणसाची दशा अवलंबून असते.

जनन, मरण, रोग, विनाश, अप्रियाची प्राप्ति, प्रियाचा वियोग ह्या सर्वांमुळें आपणांस दुःख होतें. जन्म-मरण, राग-द्वेष आदि गोष्टी सर्वत्र आहेत. आपल्या जीवनांतील विरोध व विसंगतीच्या त्या खुणा आहेत. सर्व विश्वांत विरोध भरला आहे. ह्या विरोधांतून सुटका करून घेणें म्हणजेच मुक्ति."

बुद्धांच्या ह्या प्रवचनानें राजाराणीसह सर्वजण मंत्रमुग्ध होऊन गेले.



# यशोधरेचा गौरव

**प्रवचन** संपलें. लोक बुद्धांना नमस्कार करून घराकडे परतत होते. त्या सर्व गर्दींतून बुद्धांची भिरभिर नजर यशोधरेला शोधत होती. ती कोठें दिसत नव्हती. यशोधरा रुसली असेल, आपल्यावर रागावली असेल हें बुद्धांनीं मनोमन ताडलें. तिचा राग स्वाभाविकच आहे असें त्यांना वाटलें.

दुसऱ्या दिवशीं नेहमींच्या प्रथेप्रमाणें बुद्ध आणि सर्व शिष्य शहरांत भिक्षा मागण्यासाठीं निघाले. आपल्या राजपुत्रास भिक्षा मागतांना पाहून



राजवाड्यांत आम्हीं तुझ्यासाठीं पंचपक्वान्नें तयार केलीं आहेत.

कपिलवस्तुवासीयांना कसेंसेंच वाटलें. राजाच्या कानांवर हें जातांच तो धावत आला. "बुद्धा, तूं भिक्षा मागण्यासारखी परिस्थिति नाहीं. तुझ्या हातांत हें भिक्षापात्र शोभत नाहीं. राजवाड्यांत आम्हीं तुझ्यासाठीं पंचपक्वान्नें तयार केलीं आहेत. सर्वजण तुझी वाट पाहात आहेत."


बुद्ध शांतपणें उत्तरले, "महाराज, पूर्वीं मी आपला पुत्र होतों. आज मी एक भिक्षु आहें. भिक्षांदेहि माझा धर्म आहे. भिक्षा मागण्यानें माणसाची अहंता गळून पडते. तो लीन होतो. मनानें विशुद्ध व श्रद्धावान् बनतो. आपण मला भिक्षा मागण्यास मनाई केली ह्यामागें आपला अहंकारच आहे. मी माझ्या आणि इतरांच्या मुक्तीसाठीं हा भिक्षामार्ग पत्करला आहे."

राजाला मनोमन बुद्धांचें म्हणणें पटलें. त्याचा अहंकार व घराण्याची प्रतिष्ठाच आडवी आली होती. पण हें कळूनही बुद्धांनीं आपल्या समक्ष आपल्या प्रजाजनांसमोर झोळी पसरावी हें शुद्धोदनास रुचेना. दोन तीन घरें फिरून झाल्यावर राजानें बुद्धास महालांत नेलें. तेथें भोजनाची सर्व सिद्धता झालेली होती. अनेक वर्षांनीं पिता-पुत्र एकत्र बसून जेवत होते. शुद्धोदनास प्रेमाचें भरतें आलें. गहिंवरून तो म्हणाला, "बाळ, सोन्याच्या पात्रांतून अमृतमय अन्न खाणारा तूं आतां भिक्षेच्या

तुकड्यांवर जगतोस ह्या विचारानें माझें आंतडें पिळवटून येतें. खरोखर तूं अगदीं जगाविरहित वागत आहेस. तुला काय म्हणावें मला सुचत नाहीं." ह्यावर बुद्ध कांहीं बोलले नाहींत. ते केवळ हसत राहिले. थोड्या वेळानें राणी प्रजापति व घरांतील इतर स्त्रिया आल्या. राणी प्रजापतीपासून शुद्धोदनास झालेला मुलगा नन्द, देवदत्त आणि इतर राजकुमार आले. सर्वजण बुद्धांचें दर्शन घेऊन गेले. पण आजही यशोधरा आली नाहीं. राहुल दिसला नाहीं. बुद्धांनीं अखेर स्वतःच राजाला सांगितलें, "महाराज, मला यशोधरेच्या महालाकडे घेऊन चला. मला त्यांचें दर्शन घ्यावयाचें आहे."

बुद्धांनीं यशोधरेच्या महालांत पाऊल ठेवलें तेव्हां ती पूजेंत दंग होती. केस मोकळे, पिवळीं वस्त्रें, व्रतवैकल्यांनीं वाळलेलें शरीर अशा अवस्थेंत यशोधरेला पाहातांच स्वतः बुद्धसुद्धा स्तिमित झाले. ते एकसारखे तिच्याकडे पाहात राहिले. मोठ्या प्रयासानें यशोधरेनें आपले आंसू आवरून धरले होते. पण समोर बुद्धांची साक्षात् मूर्ति पाहातांच बांध फुटून ते वाहूं लागले. आपली हृदयाची जखम विसरून यशोधरा सागराकडे निघालेल्या नदीप्रमाणें धावत सुटली व बुद्धांच्या पायांवर पडली. तिच्या डोळ्यांतून घळघळा अश्रु येत होते. तोंडांतून शब्द फुटत नव्हता. तिचें सारें शरीर थरथरत होतें. "स्वामी..........." एवढेंच ती कसेंबसें बोलली आणि पुन्हा तिनें बुद्धांच्या पायांवर डोकें ठेवलें.


"यशोधरे, माई, ऊठ! तूं थोर आहेस. तुझा त्याग मोठा आहे आणि तुला फळही मोठें मिळणार आहे. मी तुझा स्वामी नाहीं. तूंच तुझी स्वामिनी आहेस. माझ्यापेक्षांही तूं श्रेष्ठ आहेस! तूं मला क्षमा कर." असें म्हणून बुद्धांनीं तिला उठविलें. यशोधरेनें नंतर बाळ राहुलला बुद्धांच्या चरणांवर घातलें.



" स्वामी ..." एवढेंच ती बोलली आणि तिनें बुद्धांच्या पायांवर डोकें ठेवलें.

त्या दिवशीं सायंकाळीं बुद्धांनीं अखिल कपिलवस्तुवासीयांपुढें प्रवचन दिलें. शहरांतील सर्व स्त्री-पुरुष-मुलें हजर होतीं. बुद्धांनीं त्यांना 'धम्म' सूत्रें सोपीं करून सांगितलीं. यशोधरा, राहुल, राजा व राणी प्रवचनास आलीं होतीं. बुद्धांच्या ह्या प्रवचनांत त्यांचें सारें ज्ञान, सारें मार्दव, सारी करुणा प्रकट झाली होती. एका उंच व्यासपीठावर पद्मासन घालून तेज:पुंज महापुरुष बसलेला होता. मावळतीच्या सूर्याचें चक्र त्याच्या शिराभोवतीं शोभून दिसत होतें. चेहेऱ्यावर स्मिताची छटा व नेत्रांत परम करुणा होती. त्याच्या दर्शनानेंच शंका-प्रश्न पळून जात. सर्वजण देहाचे कान करून शब्दन् शब्द टिपून घेत होते. सर्वसामान्य माणसांसाठीं हिंसा न करणें, जें आपणांस लाभलेलें नाहीं त्याविषयीं उदासीन राहाणें, वासना-विकारांचे लाड न पुरविणें, असत्यापासून दूर राहाणें आणि मादक पदार्थांचें सेवन न करणें हे पांच नीतिनियम बुद्धांनीं सांगितले.

"लोक हो! मला धर्मांतराशीं कांहींही कर्तव्य नाहीं. मला केवळ माझा पंथ वाढवावयाचा नाहीं. वैदिक धर्म, पूजाअर्चा, इत्यादींची टवाळी करणें हें तथागताचें काम नाहीं. पण आमिषपूजा, यज्ञ, याग, बळी, ह्यांपेक्षां धर्मपूजा श्रेष्ठ आहे असें मी मानतों. धर्माचा पाया अंधश्रद्धा नसून डोळसपणें अंत:करणशुद्धि करणें हाच आहे. त्यासाठींच मी माझा मार्ग तुमच्या समोर ठेवला आहे. कोणाविषयींही द्वेषभाव मनांत न ठेवणें, सर्व चराचर सृष्टीवर नि:स्वार्थी प्रेम करणें म्हणजेच ब्रह्मविहार होय. आपणांस हें पटतें कीं नाहीं?" असा बुद्धांनीं जाहीर सवाल करतांच सर्व उपस्थितांनीं एकसाथ होकार दिला. बुद्धांची पूर्वीची राजधानी त्यांच्या नव्या मार्गाचें प्रमुख केंद्र बनली.



# राहुलाला उज्ज्वल वारसा

तिसऱ्या दिवशीं बुद्धांचा मुक्काम हलणार होता. राजा-राणींनीं खूप आग्रह केला. पण संन्याशानें कोठल्याही नगरींत अधिक काळ थांबतां कामा नये असें सांगून बुद्धांनीं त्यांचा आग्रह मानला नाहीं. शुद्धोदनास ते म्हणाले : “ महाराज, माझ्याजवळ माणसें कमी आहेत. आमची शक्ति मर्यादित व ही पृथ्वी अमर्याद आहे. आपण आम्हांला जाण्याची अनुज्ञा द्या. ”

बुद्ध जाणार असें कळल्याबरोबर यशोधरेनें राहुलला सजवून त्यांच्याकडे पाठविलें. मठांत येतांच राहुलनें बुद्धांचे पाय धरले. "पिताजी, मला माझा वारसा द्या!" तो बालक हट्ट धरून बसला. बुद्धांनीं त्याला उठविलें. नंतर शिष्यांकडे वळून ते म्हणाले, "भिक्षूंनो, हा माझा पुत्र माझ्याकडे वारसा मागत आहे. धम्माशिवाय व संघाशिवाय दुसरा कोठला पवित्र वारसा मानवाला उपलब्ध आहे? ह्याला आपल्यांत सामील करून घ्या." राहुल भिक्षु बनला. त्याच्या पाठोपाठ बुद्धांचा सावत्र भाऊ व आतां राज्याचा वारस कुमार नंदही आला. त्यानेंदेखील भिक्षु होण्याची इच्छा प्रदर्शित केली. बुद्धांनीं त्यालाही प्रवेश दिला. राजाला हें समजतांच तो घाबरून गेला. घाईघाईनें तो मठांत आला आणि बुद्धांना म्हणाला, "भगवन्, माझे सारेच पुत्रपौत्र भिक्षु बनावेत असा दैवयोग आहे काय?



"पिताजी, मला माझा वारसा द्या!"

माझ्या ह्या गादीस वारस कोण राहील? निदान इतर आईबापांना तरी आपण हें दुःख देऊं नये! कोठल्याही पुत्रास आईबापांच्या परवानगीशिवाय आपल्या संघांत सामील करून घेऊं नका."

बुद्धांना राजाचें म्हणणें पटलें. तथास्तु म्हणून त्यांनीं संघांत पुढें हा नियम बनविला. राहुल व नंद ह्यांच्या प्रवेशाची वार्ता कळतांच बुद्धांचे सर्व चुलतभाऊ व इतर राजकुमार संघांत दाखल झाले. ह्यांतच देवदत्तही होता. देवदत्तानें सबंध आयुष्यभर बुद्धांचा द्वेष केला. यशोधरेच्या स्वयंवरांत सिद्धार्थानें देवदत्तास दे माय धरणी ठाय केल्यापासून तर तो दांतओठ खात होता. आतांही संघांत त्यानें केवळ दुष्ट हेतूंनीं प्रवेश केला. बुद्धांनीं मनोमन हें जाणलें. पण संघाचे दरवाजे सर्वांना खुले होते व देवदत्त कदाचित् बदलेल, त्याचा हृदयपालट होईल अशी बुद्धांना आशा होती.

भिक्षु होण्यासाठीं देवदत्त बुद्धांकडे जावयास निघाला त्यावेळची हकीकत मोठी मजेदार आहे. त्या सर्व राजपुत्रांच्या अंगावर उंचीं वस्त्रें व दागिने होते. रस्त्यांत त्यांना एक न्हावी भेटला. त्यास त्यांनीं आपले सर्व दागिने व कपडे देऊन टाकले. "कुमारांनो, आपण कुठें जात आहांत?" न्हाव्यानें विचारलें. "आम्ही भगवान् बुद्धांकडे चाललों असून त्यांचे अनुयायी बनणार आहोंत" कुमारांनीं उत्तर दिलें. तेव्हां न्हाव्यानें ते दागिने व कपडे तेथल्या तेथें ठेवले व तोसुद्धा बुद्धांकडे निघाला. इतर जण बोलण्यांत गुंग आहेत असें पाहून देवदत्तानें आपले दागिने केसांच्या जुडग्यांत लपविले. पण पुढें रस्त्यानें जातां जातां एक घार झपकन् आली आणि देवदत्ताच्या केसांच्या बटांतून दागिने घेऊन गेली. देवदत्ताचें हसें झालें.

ह्या राजपुत्रांना पाहून बुद्धांना निरतिशय आनंद झाला. त्यांचा एक चुलतभाऊ आनंद आधींपासूनच संघांत सामील झालेला होता. ह्या कुमारांपैकीं

अनुक्रम 2152
विभाग का.वा.
क्रमांक 9052
दि. 391316





एक घार देवदत्ताच्या केसांच्या बटांतून दागिने घेऊन गेली.

फारच थोड्यांना बुद्धांचीं प्रवचनें समजत होतीं. पण प्रेम आणि श्रद्धा ह्यांच्या मार्गानेंही मोक्ष अथवा निर्वाण गांठतां येतें असें बुद्धांना वाटत असे. प्रेम आणि करुणा ही धर्माची प्राणदात्री शक्ति असून केवळ प्रज्ञेनें सर्व प्रश्न सुटत नाहींत, चिकित्सक बुद्धि चांगली पण एका विशिष्ट मर्यादेनंतर तीसुद्धा पंगू बनते असें बुद्ध सांगत असत. एका प्रवचनांत त्यांनीं म्हटलें आहे : “ज्या प्रश्नांचीं उत्तरें तुम्हांला हवीं आहेत पण प्रज्ञा त्या प्रश्नांचीं उत्तरें शब्दांत देऊं शकत नसेल तर तुम्ही माझ्या मार्गानें या आणि स्वतःच तीं उत्तरें मिळवा. ह्या विश्वांत सर्वसामान्य बुद्धीस अगम्य अशा कितीतरी गोष्टी आहेत. म्हणून त्या नाहींतच असें आपण कसें म्हणावें ?”

एकदा मालंक्यपुत्त नांवाचा भिक्षु आपल्या सर्व प्रश्नांना बुद्ध उत्तरें देत नाहींत म्हणून चिडला. “ माझ्या सर्व शंकांचें निरसन न झाल्यास मी धर्म सोडून परत संसारांत जाईन ” अशी त्यानें धमकीही दिली.

तेव्हां बुद्ध मिस्किलपणें म्हणाले, " मालंक्यपुत्ता, तुझें धर्मांत मन नसेल तर तूं संसारांत जावेंस हेंच बरें! तूं धर्म स्वीकारलास तेव्हां तुझ्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें देण्याचें मीं अभिवचन दिलें होतें काय? तुला तरी स्वत:ला त्या वेळीं हे प्रश्न सुचले होते काय? आजही मी तुझ्या प्रश्नांना उत्तरें न देतां केवळ एक लहानशी गोष्ट तुला सांगतों. एकाद्या माणसास विषारी बाण लागला आहे अशी कल्पना कर. त्याच्या मित्रांनीं वैद्यास आणलें. पण तो जखमी मनुष्य जर बाण काढण्याआधीं वैद्यास नाना प्रश्न विचारून भंडावून सोडील तर परिणाम काय होईल? हा बाण स्त्रीनें मारला कीं पुरुषानें, ब्राह्मणानें, क्षत्रियानें, वैश्यानें कीं शूद्रानें? मारणारा काळा होता कीं गोरा, उंच होता कीं ठेंगू? अशा नाना प्रश्नांचें उत्तर मिळाल्याखेरीज तो बाण काढूं देत नसेल तर परिणाम काय होईल हें तूं जाणतोसच. ह्या विश्वांतील नाना प्रश्नांची मालिकाही अशीच न संपणारी आहे. जन्ममृत्यूच्या दुष्ट चक्राचा, विकार-वासनांचा बाण आपल्या शरीरांत रुतून बसला आहे. तो आधीं उपटून काढला पाहिजे. "





# बुद्धांची दिनचर्या

कपिलवस्तूहून आपल्या अनुयायांसह बुद्ध राजगृहास परत आले. तेथें अनाथपिंडिका नांवाचा एक धनाढ्य व्यापारी त्यांना आपल्या नगरीस, श्रावस्तीस, घेऊन जाण्यासाठीं आला होता. बुद्धांनीं त्याचें निमंत्रण स्वीकारलें. अनाथपिंडिका आनंदला. तो आधीं श्रावस्तीस गेला व बुद्धांच्या स्वागताची त्यानें जोराची तयारी चालविली. गाडीभर सोन्याच्या मोहरा देऊन त्यांच्या मोबदल्यांत त्यानें एक सुंदर बाग खरीदली. तेथें एक भव्य विहार

उभारला. ह्या विहाराचें वर्णन वाचून त्या काळीं शिल्पकला किती उच्च कोटीस पोचली होती ह्याचें आजही आश्चर्य वाटतें. ह्या बागेस व विहारास ' जितवन ' असें नांव देण्यांत आलें.

श्रावस्तीस आल्यावर दुसऱ्या दिवशीं बुद्ध व त्यांचे सर्व अनुयायी भिक्षा मागण्यास निघाले. लक्ष्मीपुत्र अनाथपिंडिका हासुद्धा हातांत झोळी धरून त्यांच्यांत सामील झाला होता. " बुद्धांना मीं जें दिलें त्यामुळें मला परमानंद झाला आहे. सर्वांनीं हा अलौकिक आनंद मिळवावा म्हणूनच मी बुद्धदेवांस येथें घेऊन आलों." असें तो प्रत्येकास सांगत होता. श्रावस्तीकरांनीं उदारहस्तें भिक्षूंना मदत केली. एका मुलीनें आपल्याजवळील एक जाडाभरडा अंगरखा देऊन टाकला. तिच्याजवळ देण्यासारखें दुसरें कांहींच नाहीं हें अनाथपिंडिकास समजतांच तो खूष झाला. तिचा त्याग फार मोठा आहे, असें म्हणून त्यानें तिच्याकडे भरजरी वस्त्रें व दागिन्यांची भेट पाठविली.

बुद्ध आणि त्यांचे शिष्य कसे राहात असत, त्यांची दिनचर्या काय होती हें पाहाण्यासारखें आहे.



एका मुलीनें आपल्याजवळील एक जाडाभरडा अंगरखा देऊन टाकला.

संघांत सामील झालेल्या प्रत्येकास ह्या जगांत कोठलीही मालमत्ता, नातें, चांदी-सोनें, जडजवाहीर, इत्यादि ठेवतां येत नसे. भिक्षा मागूनच उदरनिर्वाह करावा असा दंडक होता. प्रत्येक भिक्षूस तीन पिवळीं वस्त्रें, तीन झगे, भिक्षापात्र, काठी, वस्तरा,

ग्रंथ, इत्यादि साहित्यापेक्षां अधिक साहित्य जवळ बाळगण्यास मनाई असे. संघांत वागण्याचे दोनशेंवर नियम होते.

स्वत: बुद्ध रोज प्रात:काळीं उठून ध्यानधारणा करीत. आपल्या पंथाविषयीं व शिकवणीविषयीं चिंतन करीत. बुद्धतत्त्वज्ञान हें त्या काळीं मानवास उपलब्ध असलेलें सर्वश्रेष्ठ नीतितत्त्व होतें. त्याची बैठक शास्त्रशुद्ध पायावर व मनोविश्लेषणावर आधारलेली होती. धर्म, तत्त्वज्ञान, रहस्यवाद, आधिभौतिकता, मानसशास्त्र, योग, इत्यादींपासून विविध विधींपर्यंत अनेक गोष्टींचा त्यांत समावेश होता. पण जीवनाप्रमाणेंच जीवनाचें तत्त्वज्ञान गतिमान राहिलें पाहिजे व त्यासाठीं सतत चिंतन व मनन करणें आवश्यक आहे असें बुद्ध म्हणत.

चिंतनानंतर ते नगरांत भिक्षा मागण्यासाठीं जात असत. कित्येकदा ते एकटे जात तर कित्येकदा शिष्यांबरोबर. पण ऊन असो, वारा असो, पाऊस असो, बुद्धांनीं भिक्षा मागणें सोडलें नाहीं. भिक्षूच्या जीवनांतील तें महत्त्वाचें कर्तव्य आहे असें त्यांना वाटे. मठांत परतल्यावर आपल्या शिष्यांना गोळा करून ते रोजचे अनुभव, लहान लहान गोष्टी, इत्यादि सांगत व त्यांमधून एकदम मोठमोठ्या तत्त्वांचें दर्शन घडवीत असत. स्वत: कोठलाही निष्कर्ष न काढतां ते शिष्यांनाच विचार करायला लावीत व त्यांना त्या निष्कर्षाप्रत येण्यास मदत करीत असत.

त्यानंतर बुद्ध भोजन घेत असत. भोजन अति साधें असे. पण भोजनाकडे त्यांचें क्वचित् लक्ष असे. भोजनोत्तर कांहीं वेळ ते आपल्या खाजगी खोलींत विश्रांति घेत आणि सायंकाळच्या प्रवचनाचा विचार करीत असत. दररोज सायंकाळीं जाहीर प्रवचन आणि शिष्यांशीं प्रश्नोत्तरें हे दोन कार्यक्रम ठरलेलेच होते. रात्रीं बराच वेळ ही प्रश्नोत्तर चर्चा चालत असे. तिचा वेळ ठराविक नसे. बुद्धांना स्वत:ला वेळेची तशी


किंमत वाटत नसे. काळाचें मृगजळ त्यांनीं ओळखलें होतें. त्यामुळें ते अतिशय स्थिर व सहनशील बनले होते. प्रवचनांतून वा चर्चेतून त्यांनीं कधींही आपला तोल जाऊं दिला नाहीं. ते कधींही रागावले नाहींत. प्रत्येकाचें समाधान करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला.

सहिष्णुता हा व्यक्ति आणि धर्माचा मुख्य गुण असला पाहिजे अशी त्यांची धारणा होती. काळ अथांग आहे. सहस्रावधि मैल लांब-रुंद-उंच अशा कठीण प्रस्तराच्या पर्वतावर शतकांतून एकदा मलमलीच्या फडक्यानें आघात करीत राहावेत म्हणजे तो पर्वत जितक्या लवकर फुटेल त्याहीपेक्षां काळ संपायला अधिक वेळ लागेल. तेव्हां वेळेची सबब कोणासही सांगूं नका असें ते म्हणत असत.

आपल्या प्रवचनांतून व शिकवणींतून अन्य धर्मपंथांवर टीका करण्यास त्यांनीं मनाई केली होती. एकदा एका ब्राह्मणानें बुद्धावर व संघावर कडक टीका केल्यामुळें बुद्धशिष्य चिडून गेले. पण बुद्धांनीं त्यांना सांगितलें कीं दुसरे माझ्याविरुद्ध बोलतात म्हणून तुम्ही त्यांच्याविरुद्ध बोलूं लागलांत तर मला दु:ख होईल. तुम्ही रागवाल, असंतुष्ट व्हाल तर अध्यात्मिक दृष्ट्या तुमचीच हानि होईल. रागाच्या भरांत तुम्ही दुसऱ्याची टीका योग्य कीं अयोग्य हें ठरविण्यास पात्र राहाणार नाहीं.

एक गृहस्थ बुद्धांजवळ येऊन असेंच कांहीं तरी बरें वाईट बोलले. बुद्ध त्यांना शांतपणें म्हणाले, "एकाद्यानें याचकापुढें अन्न ठेवलें पण याचकानें तें नाकारलें तर तें अन्न कोणाचें?" त्या गृहस्थांनीं उत्तर दिलें, "देणाऱ्याचें!" त्यावर बुद्ध म्हणाले, "मग तुमचे शिव्याशाप स्वीकारायचें मीं नाकारलें तर ते कुणास मिळतील?"

बुद्धांचें वर्तन असें सुसंस्कृत असे. आपल्या प्रत्यक्ष जीवनांतून व दिनचर्येतून ते इतरांपुढें आदर्श ठेवीत होते.



# नर्तिका आम्रपालीचा आदर

बुद्ध फिरत फिरत वैशालीस आले. तेथें आम्रपाली नांवाची एक नर्तिका राहात होती. ह्या नर्तिकेच्या सौंदर्याची व कलेची सर्वत्र कीर्ति पसरली होती. देशोदेशींचे राजे-महाराजे, जमीनदार, सावकार तिच्याकडे येत असत. आम्रपालीच्या मालकीची एक मोठी आंबराई होती, म्हणून तिला हें नांव पडलें म्हणतात. आम्रपाली मनोमन बुद्धांवर भाळली होती. बुद्धांना तिनें प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें. पण त्यांच्या कथा तिनें ऐकल्या होत्या.

वैशालीस बुद्ध येत आहेत हें कळतांच तिला कमालीचा आनंद झाला. तिनें त्यांना आपल्या आंबराईतच राहाण्याची विनंती केली. बुद्धांनीं ती आनंदानें मान्य केली.


एक दिवस साजशृंगार करून आम्रपाली स्वतः बुद्धांना भेटावयास आली. प्रवेशद्वारावरील शिष्यानें ती गणिका आहे हें जाणलें आणि तिला आंत बुद्धांजवळ नेण्यास नकार दिला. बुद्धांना त्यांचा संवाद ऐकूं आला. तेव्हां ते स्वतःच बसल्या जागेवरून म्हणाले, " शिष्या, त्यांना आंत घेऊन ये. तथागताजवळ कोठलेही भेदाभेद नाहींत. गरीब, श्रीमंत, ब्राह्मण, शूद्र, धर्मोपदेशक नि गणिका हे आमच्या दृष्टीनें समानच आहेत. कोणीही मुळांत हीन नाहीं. "

आम्रपाली आंत आली. पद्मासन घालून बसलेली बुद्धांची ती तेजस्वी मूर्ति पाहून ती थक्क झाली. तिच्या मनांतील असद्विचार वितळून गेले. वाकून तिनें नमस्कार केला. काय बोलावें हें तिला सुचेना. तिच्या मनांतील गोंधळ अंतर्ज्ञानानें ओळखून बुद्ध म्हणाले, " माई, बसा ! "

आम्रपालीचें गर्वहरण झालें. आपल्या सौंदर्याबद्दलचा तिचा विश्वास कोठल्या कोठें पळाला. तिनें बुद्धांचे चरण धरले व ती क्षमायाचना करूं लागली. " आपण क्षमा करण्यासारखा कोठलाही अपराध केलेला नाहीं मग ही याचना कशासाठीं ? शांत व्हा ! " बुद्धांनीं तिला सांगितलें. आम्रपाली बुद्धांसमोर खालीं बसली. नंतर बुद्ध आपल्या शिष्यांकडे वळून म्हणाले, " भिक्षूंनो, एका रानांत एक सुंदर पक्षी राहात होता. त्याचे पंख मोठे मनोहर होते. एके दिवशीं रानाला आग लागली. त्या वणव्यांत सर्व प्राणी होरपळून निघूं लागले. वाघ, सिंह, हत्ती, लांडगे, कोल्हे, इत्यादि सर्व सैरावैरा पळूं लागले. तेव्हां त्या पक्ष्यानें आग विझविण्याचा निर्धार केला. तो आपले पंख शेजारच्या नदींत बुडवी आणि त्या जागेवर तें पाणी शिंपडत



तिच्या मनांतील गोंधळ अंतर्ज्ञानानें ओळखून बुद्ध म्हणाले, " माई, बसा ! "




...तो आपले पंख शेजारच्या नदींत बुडवी आणि ...

असे. इतर प्राणी हा प्रकार पाहून हसले. आग केवढी नि हा पक्षी केवढा म्हणून सर्वांनीं त्याचा उपहास केला. पण पक्ष्यानें आपले प्रयत्न सोडले नाहींत. ह्या धडपडींत त्याचे सुंदर पंख जळाले. शेवटीं तोसुद्धा अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडला. पण त्यानें केलेलें सत्कृत्य अमर होतें. ह्या जन्मीं तोच पक्षी ह्या सुंदर आम्रपालीच्या रूपानें अवतरला आहे. ही आम्रपाली सत्प्रवृत्त, शुद्धचरित आहे असें मीं म्हटलें तर तुम्हांला धक्का बसेल. पण भिक्षूंनो, ही वस्तुस्थिति आहे. ही गणिका अतिपावन आहे, पण अनेक सच्चरित समजलीं जाणारीं माणसें वास्तवांत तशीं नसतात. माणसाच्या बाह्य

रूपावरून वा व्यवसायावरून हें ठरत नाहीं. आम्रपाली निर्वाणाप्रत जाणार आहे. प्रत्येक जन्मांत तिची अशी प्रगति होत आलेली मी पाहातों आहें."


बुद्धांचा हा अनपेक्षित अनुग्रह आणि आपल्या पूर्वजन्मांचें रहस्य कळल्याबरोबर आम्रपाली अंतर्बाह्य बदलली. तिनें नम्रपणें बुद्धांना आपल्या घरीं भोजनास बोलाविलें. बुद्धांनीं तिच्या निमंत्रणाचा स्वीकार केला. आम्रपालीकडे बुद्ध भोजनास जाणार हें कळतांच वैशालींत बरीच खळबळ माजली. बुद्धांना प्रत्यक्षच विचारावें म्हणून कांहीं प्रतिष्ठित त्यांच्याकडे आले. सरळ सरळ तोच मुद्दा कसा काढावा म्हणून दोघातिघांनीं बुद्धांना




बुद्धांनीं आनंदानें भोजन केलें.

आम्रपालीनें बोलाविलें होतें त्याच दिवशीं आपल्याकडे येण्याचें निमंत्रण दिलें. पण बुद्धांनीं साफ नकार दिला. "मीं आम्रपालीचें निमंत्रण स्वीकारलें आहे" असें त्यांनीं सांगितलें. "कोण आम्रपाली? ती गणिका? अन् तिचें निमंत्रण!...." असे उद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडतात न पडतात तोंच बुद्ध गंभीर आवाजांत म्हणाले, "होय, सज्जन हो, तुम्ही म्हणतां तीच माता आम्रपाली!" ते हिरमुसले होऊन तेथून परतले.

दुसऱ्या दिवशीं बुद्ध आम्रपालीकडे भोजनास गेले. तिनें स्वतः भक्तिभावानें नाना पदार्थ तयार केले होते. समया लावल्या होत्या. रांगोळी घातली होती. बुद्धांनीं आनंदानें भोजन केलें. शेवटीं निरोप घेतेवेळीं आम्रपालीनें आपलें निवासस्थान विहारासाठीं स्वीकारण्याची बुद्धांना विनंती केली व त्यांनीं ती मान्य केली. अखेरपर्यंत आम्रपाली बुद्धशिष्या म्हणून राहिली.





# अजातशत्रूचीं कारस्थानें

मगध सम्राट् बिम्बसार सुरुवातीपासून बुद्धप्रेमी होता. स्वतः राजा आणि त्याची थोरली राणी वासवी बौद्धधर्माचा प्रचार करीत. त्यांनीं अनेक बुद्धविहार बांधले. बिम्बसारची धाकटी राणी छलना वैशालीच्या लिच्छवी राजघराण्यांतील होती. जैन तीर्थंकर महावीरस्वामींची ती निकटची नातेवाईक. राजाचें आपल्यावर विशेष प्रेम नाहीं आणि राजा व थोरली राणी बुद्धाच्या नादीं लागून ह्या देशांत त्यांचा धर्मप्रसार करीत आहेत हें

छलनाला आवडलें नाहीं. तिचा मुलगा राजपुत्र अजातशत्रु हा अति उद्धत आणि महत्त्वाकांक्षी होता. छलनेनें त्याची महत्त्वाकांक्षा अधिक भडकविली. बुद्धाचा चुलतभाऊ आणि त्याचा नित्य द्वेष करणारा अजातशत्रु ह्यांचें तिला अनायासें साह्य मिळालें. छलना, अजातशत्रु व देवदत्त ह्या त्रिकुटानें एक षड्‌यंत्र रचलें. प्रथमत: अजातशत्रूनें बिम्बसार आणि वासवीदेवी ह्यांना नजरकैदेंत ठेवलें व बापाच्या हयातींतच स्वत:च्या नांवानें द्वाही फिरविली. देवदत्ताच्या सांगण्यावरून अजातशत्रूनें बुद्धांना मगध देशांत प्रचार करण्यास मनाई केली. लोकांनीं त्यांच्या प्रवचनास जाऊं नये असें फर्मान काढलें. बुद्धविहारांना कुलुपें लावलीं. पण ह्या सर्वांचा परिणाम उलट झाला. बुद्धधर्माचा डिंडिमा अधिक जोरानें वाजूं लागला. स्वत: बुद्धांनीं अजातशत्रूचा हुकूम कधींच मानला नाहीं. "ही सर्व भूमि म्हणजे तथागतास आपलें घर वाटतें. राजपुत्रा, तुझ्या डोळ्यांवर जें अभ्रपटल आलें आहे त्यामुळें तूं स्वत:ला ह्या प्रदेशाचा मालक समजूं लागला आहेस. पण तूं स्वत:चाही स्वामी नाहींस तेथें ह्या विशाल मगध देशाचा स्वामी कसा होशील?" बुद्धांच्या ह्या वाणीनें अजातशत्रूच्या अंगाची लाही लाही झाली. पण बुद्धांवर उघड शस्त्र उगारण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं.

देवदत्ताच्या मनांतील द्वेषाग्नीनें ही संधि साधण्याचें ठरविलें. त्यानें गुप्त रीतीनें कांहीं मारेकरी बुद्धांच्या मठांत पाठविले. पण बुद्धांची ती निर्धास्त, शांत व तेजस्वी मूर्ति पाहातांच मारेकऱ्यांना उपरति झाली. त्यांनीं शस्त्रें फेकलीं आणि बुद्धांचे पाय धरले. ह्यामुळें देवदत्त अधिकच चिडला. त्यानें एका मदोन्मत्त हत्तीस खूप दारू पाजून व चिडवून बुद्धांच्या अंगावर सोडलें. रस्त्यांत जें जें म्हणून आडवें येईल त्याचा त्या हत्तीनें चुराडा केला. आतां तो सरळ बुद्धांच्या अंगावर चालून जाणार तेवढ्यांत बुद्धांनीं न डगमगतां शांतपणें आपला उजवा हात वर केला. हत्ती जागच्या जागीं थंड झाला. त्यानें सोंड उंचावून व मान वाकवून बुद्धांस वंदन केलें.

अजातशत्रूचेंही मन त्याला खात होतें. मातापित्यांची स्मृति त्याला स्वस्थता लाभूं देत नव्हती. सदसद्विवेकबुद्धीची सारखी टोचणी सुरू होती. झोपेंत स्वतःच्या दुष्कृत्यांचीं दुस्स्वप्नें पडत होतीं. जिवंतपणींच तो नरकयातना भोगीत होता. अखेर बुद्धास शरण गेल्याशिवाय शांति लाभणार नाहीं असा त्याच्या अंतःकरणानें कौल दिला. अहंकारी अजातशत्रूनें बुद्धांचे पाय धरले व देवदत्तास आपल्या दरबारांतून हाकून दिलें. पुन्हा मगधांत बुद्धधर्मास राजाश्रय लाभला. बुद्धांनीं अजातशत्रूस क्षमा केली.




... तेवढ्यांत बुद्धांनीं न डगमगतां शांतपणें आपला उजवा हात वर केला.

देवदत्तास असा चोहीकडून पराभव पत्करावा लागल्यानें तो शरमला. पण त्याचा स्वभाव बदलला नाहीं. त्यानें बुद्धास शरण जाण्याचें नाटक केलें व बुद्धांच्या पायांना स्पर्श करतेवेळीं आपल्या नखांतून लपविलेलें विष त्यांच्या पायास टोचण्याचा प्रयत्न केला. बुद्धांनीं पायाच्या केवळ एका अंगठ्यानें त्यास दूर ढकललें. देवदत्त गडबडत जमिनीवर पडला. त्याच सुमारास प्रचंड आवाज होऊन धरणी दुभंगली आणि देवदत्त तींत गडप झाला.

अजातशत्रूच्या हृदयपालटानंतर आणि देवदत्ताच्या अंतानंतर राणी छलनादेखील बुद्धास शरण आली. पण आतां खुद्द बुद्धांच्या अनुयायांत भांडणें सुरू झालीं होतीं. कांहीं क्षुद्र गोष्टीवरूनही भिक्षु एकमेकांवर तुटून पडत. आनंद, सारीपुत्त, मोगल्लन् हे त्यांच्यांत समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असत. कित्येकदा स्वत: बुद्धसुद्धा सर्वांना शांत करीत. पण आपल्या हयातींतच संघाची ही दशा झालेली पाहून त्यांना कमालीचें दु:ख झालें.



देवदत्त गडबडत जमिनीवर पडला.



# स्त्रियांना अनिच्छेनें संघांत प्रवेश

बुद्धविहारांत कलागती लागून शैथिल्य येण्यास स्त्रियाही बऱ्याच अंशीं कारणीभूत झाल्या. भिक्षुणींपैकीं कांहीं जणी माहेर वा सासरहून पळून आलेल्या असत. कांहीं भग्नाश असत तर कांहीं सुखलोलुप. बुद्ध सुरुवातीस स्त्रियांना संघांत प्रवेश देण्याविरुद्ध होते, पण त्याचें असें झालें :

राजा शुद्धोदन अखेरचे क्षण मोजीत असतांना सारखा बुद्धांची आठवण करीत होता. बुद्धांनीं अंतर्ज्ञानानें आपल्या पित्याची हाक ऐकली

व ते तावडतोब कपिलवस्तूस गेले. राजा ‘बुद्ध बुद्ध’ करीत आजारांत निपचित पडून होता. त्याची नजर परलोकाकडे लागली होती. बुद्धांनीं राजाचें मस्तक आपल्या मांडीवर घेतलें व त्याच्या कानांत धम्मसूत्रें उच्चारलीं. राजा त्यांचा पुनरुच्चार करण्याच्या अवस्थेंत नव्हता. पण तो मंत्र ऐकतांच त्याच्या डोळ्यांत लकाकी आली. देहाचे सर्व रोग गेले. दु:ख पळालें. मनाला शांति लाभली आणि राजानें समाधानानें प्राण सोडला. बुद्धांनीं गतप्राण पित्यास अखेरचा प्रणिपात केला व ते राजगृहाकडे परत निघणार तोंच राणी प्रजापतीनें त्यांना अडविलें. “बुद्धा! आम्हांला कां सोडून जातोस! आम्हीही तुझ्या संघांत सामील होऊं इच्छितों.”

“सर्वांनींच संघांत सामील होण्याची आवश्यकता नाहीं. आपापल्या जागीं राहूनही ज्ञानप्राप्ति करून घेतां येते. आत्मशुद्धि हें ज्ञानप्राप्तीचें साधन आहे. आत्मशुद्धीसाठीं संघांतच आलें पाहिजे असें नाहीं. त्यांतून आम्हीं स्त्रियांना अद्याप संघांत घेतलेलें नाहीं.” बुद्धांनीं उत्तर दिलें.

**प्रजापति :** बुद्ध, स्त्रियांना संघांत येऊन ज्ञानप्राप्ति करून घेण्याचा अधिकारच नाहीं काय? त्यांना हें स्वातंत्र्य नाहीं काय?



बुद्धांनीं राजाचें मस्तक आपल्या मांडीवर घेतलें.

**बुद्ध :** स्त्रियांना तो अधिकार आणि तें स्वातंत्र्य आहेच. धम्म स्त्री-पुरुषादि भेदाभेद जाणत नाहीं. पण मीं आपणांस दैनंदिन आचरणाची अडचण सांगितली. आम्हीं सोयीसाठींच स्त्रियांना संघांत घेतलें नाहीं.

**प्रजापति :** बुद्ध, स्त्रियांना संघाचे नियम झेपणार नाहींत असें आपणांस वाटतें काय ? स्त्रियांवर तुमचा अविश्वास कां ? राजपुत्री यशोधरेचें आदर्श उदाहरण तुमच्या डोळ्यांसमोर असतांना हा पक्षपात कां ?

राणी प्रजापति, यशोधरा आणि अन्य महिलांचा हा युक्तिवाद ऐकून आनंदही त्यांच्या बाजूनें बोलूं लागला. तेव्हां बुद्धांनीं त्यास आपल्या मागील संवादाची आठवण करून दिली.

एकदा आनंदनें विचारलें, " देवा, आम्हीं स्त्रियांच्या बाबतींत कसें वागावें ? "

बुद्ध उत्तरले, " आनंद, त्यांचें दर्शन घेऊं नकोस. "

**आनंद :** पण त्यांची आमची गांठ पडली तर आम्हीं काय करावें ? "

**बुद्ध :** त्यांच्याशीं बोलूं नकोस.


**आनंद :** पण त्या आमच्याशीं बोलल्या तर ?


**बुद्ध :** अत्यंत दक्ष राहा.

पण आनंद ह्या आठवणीनंतरही म्हणाला, " भगवन्, मला आपला हा युक्तिवाद त्या वेळींही पटला नव्हता आणि आजही पटत नाहीं. स्त्रियांना संघांत मज्जाव करून आपण त्यांना पुरुषांपेक्षां हीन समजतों असेंच दर्शवीत आहोंत. "

अखेर बुद्धांनीं प्रजापति, यशोधरा आणि अन्य स्त्रियांना संघांत प्रवेश दिला. पण ते म्हणाले, " आनंद, स्त्रियांना प्रवेश दिला नसता तर संघ सहस्र वर्षें टिकला असता. आतां तो पांचशेंच वर्षें टिकेल. " प्रजापति,

यशोधरा आणि अन्य महिलांनीं बुद्धांचें हें म्हणणें खोटें ठरविण्याचा आपल्या परीनें प्रयत्न केला. कपिलवस्तु ते वैशालीपर्यंत ह्या राजघराण्यांतील महिला पायीं चालत आल्या. पायांतून रक्त निघत असतांना, उन्हाचे कडक चटके बसत असतांना आणि भूक-तहानेनें प्राण कासावीस झाला असतांनासुद्धां त्यांनीं किंचित्‌ही कुरकुर केली नाहीं. पण पुढें पुढें संघांत कित्येक अनिष्ट व्यक्ति व प्रवृत्ति शिरल्या. महिलांचा प्रवेश हें त्याचें एक कारण होतें. पण यशोधरा, किशा गौतमी, धम्मदिना ह्यांच्यासारख्या ज्ञानी महिलांनीं संघांत राहून आत्मोद्धारही करून घेतला.





# बुद्धांचा शिष्यगण

“हे भिक्षूंनो, ऐका, मला अमरत्वाचा बोध झाला आहे. मी आतां तें ह्या जगाला सांगणार, धम्म शिकविणार!” अशी बोधप्राप्तीनंतर बुद्धांनीं घोषणा केल्यापासून शेकडों शिष्य त्यांच्याभोवतीं जमा झाले होते. ठिकठिकाणीं बुद्धविहार निघत होते. पण ह्या सर्व शिष्यगणांत आनंद, सारीपुत्त व मोगल्लन् हे बुद्धांचे फार आवडते होते. आनंद आणि बुद्ध म्हणजे लक्ष्मण आणि राम. आनंद स्वभावानें अति

कनवाळू, वृत्तीनें सोशिक. बुद्धतत्त्वज्ञानाचे बारकावे कळण्याइतकी त्याची झेप नव्हती पण त्याची बुद्धांवर अपार श्रद्धा होती. सदैव तो त्यांच्या पाठीशीं असे. मृत्युसमयींही आनंदच बुद्धांजवळ होता. बुद्ध अनेकदा नर्मविनोद करून त्याची थट्टा करीत.

नात्यानें आनंद बुद्धांचा चुलतभाऊ. देवदत्तही चुलतभाऊच. पण दोघांचें बुद्धांवरील प्रेम किती भिन्न होतें ! बौद्धधर्मग्रंथांतून बुद्ध आणि आनंद ह्यांच्या संवादांचे अनेक कथाप्रसंग सापडतात. बुद्ध बहुधा आपली मनोव्यथा त्याच्याजवळच बोलून दाखवीत असत.

बुद्ध हे योगी होते, ज्ञानी होते आणि संसाराचा त्यांनीं त्याग केला होता तरी ते माणसांपासून दूर पळून गेले नाहींत. उलट ते नित्य बहुजन-समाजांत वावरत असत. प्रत्येकाच्या जीवनास स्पर्श करीत. लोकांच्या सुखदु:खांशीं समरस होत. अहोरात्र त्यांच्याकडे लोकांची रीघ लागलेली असे. लोकांच्या किंवा शिष्यांच्या मेळाव्यांत बसून विचारविनिमय करण्यांत, इतरांशीं बोलण्यांत त्यांना आनंद होत असे. बौद्धधर्मांतील तत्त्वें काय आहेत ह्यापेक्षांही बुद्ध कसे आहेत ह्याचीच त्या वेळीं देशभर चर्चा सुरू होती. त्यांच्या धर्माचा विजय हा बराचसा त्यांच्या व्यक्तित्वाचा विजय होता. निर्मळ मन, स्नेहपूर्ण वागणूक, परम कारुण्य, राजबिंडें रूप, कोणाशींही नम्रपणें बोलून त्याला स्वत:लाच विचार करायला लावण्याची हातोटी ह्यांमुळेंच त्यांच्याकडे राजापासून रंकापर्यंत सारे येत. नर्तकी आम्रपाली-पासून सम्राट बिम्बसारापर्यंत सर्वांना बुद्ध समानतेनें वागवीत.

हनुमंताशिवाय जसें रामायण पूर्ण होणार नाहीं तसें सारीपुत्त व मोगल्लन् ह्या शिष्यद्वयाशिवाय बुद्धचरित पूर्ण होणार नाहीं. बुद्धांचे हे दोघेही परमप्रिय शिष्य होते. ते जातीनें ब्राह्मण, वेद-उपनिषदें, शास्त्रें-पुराणें, इत्यादि जाणणारे विद्वान् होते. सुरुवातीस ते संजय नांवाच्या मुनीकडे होते. पण

त्यांना तेथें समाधान लाभलें नाहीं म्हणून इकडे तिकडे फिरत होते. एके दिवशीं सकाळीं राजगाह ( ह्यालाच राजगीर वा राजगृह असेंही संबोधण्यांत येतें ) नगरींत भिक्षा मागतांना सारीपुत्तास एक भिक्षु दिसला. त्याचा वेष, त्याचें वागणें आणि त्याहीपेक्षां त्याच्या तोंडावरील अध्यात्माचें तेज पाहून सारीपुत्त चकित झाला. त्या भिक्षूजवळ जाऊन सारीपुत्तानें तुझे गुरु कोण म्हणून विचारपूस केली. "माझे गुरु शाक्यमुनि ( बुद्धांस शाक्यमुनिही म्हणत ) असून त्यांना जन्ममृत्यूपासून मुक्ति मिळविण्याचा मार्ग सापडला आहे." असें त्या भिक्षूनें सांगतांच सारीपुत्तही त्याच्याबरोबर बुद्धांकडे गेला. बुद्धांना पाहातांच त्याच्या अंतरात्म्यानें ग्वाही दिली कीं हाच तो गुरु. ह्याच्या शोधार्थच मी वणवण भटकत होतों. माझ्या अंतर्विश्वावर ह्याचाच अज्ञात प्रभाव पडलेला होता. सारीपुत्तानें बुद्धांचे पाय धरले.

सारीपुत्त आणि मोगल्लन् ह्या दोन्ही मित्रांनीं आपसांत असा करार केलेला होता कीं त्यांच्यापैकीं कोणासही सत्यशोधनाचा मार्ग प्रथम सापडला तरी तो त्यानें दुसऱ्यास सांगावा. सारीपुत्तानें मोगल्लनास बुद्धांबद्दल सांगितलें व मोगल्लन्ही बुद्धशिष्य बनला. त्यांची विकसित बुद्धि, विद्वत्ता आणि निग्रह पाहून बुद्धांनीं दोघांकडे विशेष लक्ष देण्यास सुरुवात केली. आपणा दोघांपैकीं गुरूंचा अधिक आवडता कोण, अशी त्यांच्यांत गमतीदार पैज लागे. पण ते दोघेही बुद्धांना सारखेच प्रिय होते. दोघांचें गुरूवर आणि परस्परांवर उत्कट प्रेम होतें. बुद्धांनीं आपला पुत्र राहुल ह्याच्या अध्यात्मिक शिक्षणाचें कार्य त्यांच्यावर सोपविलें.

सारीपुत्त व मोगल्लन् प्रेमांत जुळ्या भावांप्रमाणें होते पण त्यांचें बाह्य स्वरूप परस्परांविरुद्ध होतें. मोगल्लन् शरीरानें धिप्पाड, महान शक्तिशाली व कृष्णवर्णीय होता. एकदा आपल्या लाथेच्या फटकाऱ्यानें त्यानें सबंध विहाराची दुमजली इमारत हादरून टाकली होती म्हणे. तो मानसशास्त्र



संग्रहा
अनुक्रम
विभाग



मोगल्लन्


होता. मनांत येईल तसे आकार धारण करणें, निरनिराळ्या कुडींत आपला प्राण घालणें, इत्यादि विद्येंत देखील तो प्रवीण होता अशी नोंद सापडते.

सारीपुत्त हा साधारण बांध्याचा, गौरवर्णीय आणि विद्वान् होता. त्याचा स्वभाव गंभीर, बोलणें थोडें आणि ध्यानधारणेकडे अधिक लक्ष होतें. सारीपुत्त सहसा इतरांत मिसळत नसे. त्याची बुद्धिमत्ता प्रथम श्रेणीची होती तरी तो अति विनम्र होता. विहाराची फरशी झाडण्यांत त्याला मुळींच कमीपणा वाटत नसे. तसेंच तो नवागत शिष्यांच्या सूचनांनासुद्धा महत्त्व देई.

बुद्धांच्या मृत्यूआधीं एकच महिना सारीपुत्ताचें त्याच्या मूळ गांवीं, नाल येथें, देहावसान झालें. एका भिक्षूनें त्याच्या अस्थि आणि पिवळा झगा सावत्ती येथें बुद्धांना आणून दिला तेव्हां त्या योग्याचें अंत:करणही क्षणभर विषण्ण झालें.

मोगल्लन्चा त्याच्या विरोधकांकडून खून करण्यांत आला. असें म्हणतात कीं त्याच्या दैवीशक्तीमुळें तो सहा वेळां मारेकऱ्यांच्या हातून निसटला. पण सातव्यांदा कलाशील विहारांत तो बेसावधपणें मारला गेला. बुद्धांच्या अंतापूर्वीं केवळ दोन आठवडे आधींच ही घटना घडली. मृत्यूपूर्वीं जखमी अवस्थेंत मोगल्लन् बुद्धांकडे आला आणि त्यांच्या पायांशींच त्यानें प्राण सोडला. अशा प्रकारें बुद्धांचे दोन्ही परमशिष्य त्यांना आधींच सोडून गेले.

सांची येथील बौद्धस्तुपांत ह्या दोघांचे अस्थिअवशेष जपून ठेवण्यांत आले आहेत.



# आत्म्याचा शोध घ्या

आतां आपल्या जीवनाची सायंकाळ आली आहे अशी बुद्धांना जाणीव होत होती. त्यांचें वय ८० वर्षांचें झालें होतें. शरीर किंचित् थकलें होतें. गेलीं ४५ वर्षें त्यांनीं अहोरात्र आपल्या नव्या धर्माचा प्रचार व प्रसार केला होता. ईशान्येस नेपाळतराईपासून तो खालीं आंध्रदेशापर्यंत आणि मध्यप्रदेशापर्यंत त्यांच्या पंथाची पताका फडकत होती. अनेक राजे, महाराजे ह्या नव्या धर्मक्रांतींत सहभागी झाले होते. ज्ञानाचें

भांडार ही कोणाचीही मक्तेदारी नाहीं आणि कोणीही उच्च व कोणीही नीच नाहीं ह्या विचारसरणीमुळें पददलितांना बुद्धांबद्दल आत्मीयता वाटे. त्यांनीं सुचविलेला अष्टाध्यायी मार्ग हें त्या काळीं मानवास उपलब्ध असलेलें सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञान होतें. ह्यामुळें इतरांनाही ह्या पंथाबद्दल आकर्षण वाटूं लागलें होतें. मानवी मनांत कोठेंतरी खोलवर अशी आकांक्षा दडून बसलेली असते कीं आपण कोणाचें तरी, व्यक्तीचें वा पंथाचें असावें, कोणाशीं तरी आपलें निष्ठेचें नातें असावें. बुद्धांच्या काळीं भारत कसा होता ? त्यांत सामाजिक व राजकीयदृष्ट्या विघटन सुरू होतें. संघर्षाच्या ठिणग्या पडत होत्या. वैदिक धर्मातील यज्ञयागादि गोष्टींना विकृत स्वरूप येऊन बहुजनांची धार्मिकश्रद्धा भंग पावत होती. जनमानसाच्या दृष्टीनें व ऐतिहासिक परिस्थितीच्या दृष्टीनें नव्या श्रद्धेच्या, नव्या धर्माच्या वा नव्या अवताराच्या जन्मास हा काळ अत्यंत अनुकूल होता. काळाच्या ह्या लाटेवरच बुद्ध आणि त्यांचीं तत्त्वें वर आलीं. इन्द्रप्रस्थ व अयोध्या ह्यांचें महत्त्व कमी होऊन पाटलिपुत्र ( हल्लींचें पाटणा ) नगरी भारताचें मुख्य केंद्र बनली.

बौद्ध धर्माच्या ह्या नव्या लाटेनें नवविचार मुक्त केले. मानवाच्या सर्व प्रवृत्तींना ह्या पंथांत आपल्या विकासाचीं बीजें आढळलीं. नवी निष्ठा मिळाली. जीवनांतील पोकळी भरून निघाली. साहित्य, शिल्प, इत्यादि कलांना उत्तेजन मिळत गेलें. पुढें पुढें तर बौद्धधर्मानें ह्या क्षेत्रांत अपूर्व कामगिरी केली. वस्तुत: आजसुद्धा भारतीय कला व संस्कृति ह्यासंबंधीं बोलतांना आपणांस बौद्धधर्मीय कला व शिल्प नि संस्कृति ह्यासंबंधींच बोलावें लागतें. अजिंठा, वेरूळ आदि ठिकाणच्या बौद्धधर्मकालीन शिल्पाकृति अमर आहेत. बुद्धांना आपल्या हयातींतच आपल्या धर्माच्या ह्या विकासाची जाणीव झालेली होती.

बुद्धांनीं स्वतः कांहींही लिहिलें नाहीं. वेद, उपनिषदें किंवा पुढें निर्माण झालेलीं बायबल, कुराण ह्यांप्रमाणें बुद्धांचा कोठलाही आधारभूत ग्रंथ नाहीं. त्यांच्या पंथानें देव मानला नाहीं व कोणी प्रमुख धर्मगुरु पोपसारखा नेमला नाहीं. बुद्धांच्या ह्यातींत मात्र अर्थातच ते सर्वश्रेष्ठ अधिकारी पुरुष व गुरु होते. दिव्यानें दिवा लावावा तसा एकाकडून दुसऱ्याच्या अंतःकरणांत ह्या तत्त्वाचा प्रसार होत होता. कालांतरानें देशामागून देश बुद्धानुयायी बनले. आजही जगांतील एक चतुर्थांश लोक ह्या धर्माचे अनुयायी आहेत.

आयुष्याच्या शेवटीं शेवटीं बुद्ध नेहमीं आपल्या शिष्यांबरोबर असत. त्यांच्याशीं खूप बोलत. प्रत्येकाला स्वतः होऊन शंका-प्रश्नांबद्दल विचारीत. एकदा कौशांबीच्या शिंशपवनांतून फिरत' असतांना बुद्धांनीं शिंशपवृक्षाचीं कांहीं पानें आपल्या हातांत घेतलीं व 'ते शिष्यांना म्हणाले, "भिक्षूंनो, माझ्या हातांतील पानें वनांतल्या पानांपेक्षां कमी आहेत कीं अधिक?"

**शिष्य :** आपल्या हातांतील पानें खूपच कमी आहेत.

**बुद्ध :** ज्ञानाचें असेंच आहे. ह्या विश्वांत खूप ज्ञान भरलेलें आहे. त्यांतील मूठभर मीं मिळविलें आणि त्यांतील थोडेंसेंच तुम्हांला देऊं शकलों. आतां तुम्हीं स्वतःच अधिक ज्ञान मिळवायचें आहे. शिष्यांनो, इतर सर्व गोष्टींप्रमाणें ज्ञानसुद्धा व्यक्तिसापेक्ष आहे. तुमच्या उद्धाराचा मार्ग तुम्हीं कसा शोधून काढावा ह्याचें केवळ दिग्दर्शन मीं केलें. बुद्ध असलों तरी तथागत एवढेंच करूं शकतो."


तेवढ्यांत एका शिष्यानें प्रश्न केला, "भगवन्, सर्वांत पूज्य कुणास मानावें? राजाधिराज कोण?" बुद्ध उत्तरले, "हे भिक्षु, धर्म सर्वश्रेष्ठ आहे. तोच राजाधिराज! धर्मांत सर्व कांहीं येतें. धर्म म्हणजे ह्या सर्व

चराचरांत भरून राहिलेली व्यवस्था, निसर्गाचे नियम, कार्यकारणभावाची सांखळी. धर्म म्हणजे सत्य, धर्म म्हणजे न्याय."

दुसऱ्या एका शिष्यानें विचारलें, "आत्मा म्हणजे काय? आत्म्याचा प्रभु कोण?"

**बुद्ध :** आत्म्याचा प्रभु आत्माच. दुसरा कोण असणार? आणि आत्मा म्हणजे आकार, भावना, विचार, इत्यादि गोष्टी नव्हेत! झाडांचीं पानें, फुलें, फांद्या, इत्यादि म्हणजे जसें झाड नव्हे तसा मनुष्य ,देह व त्याच्या विविध संवेदना म्हणजे आत्मा नव्हे! आत्मा हें एक स्वयंभू, स्वयंसिद्ध, चिरंतन असें तत्त्व आहे. 'हें माझें नाहीं, मी हें नाहीं, हें मी नाहीं.' हें महत्त्वाचें सूत्र लक्षांत ठेवून स्वतःच आत्म्याचा शोध करा. तेंच तर आपलें कर्तव्य आहे.





# पूर्वजन्मींची हृद्य आठवण

एके दिवशीं सायंकाळीं असाच मेळावा जमला असतांना आनंदनें विचारलें, “ भगवन्, आपण म्हणतां कीं जन्माबरोबर जीवन सुरू होत नाहीं वा मृत्यूबरोबर तें संपत नाहीं. आपला चालू जन्म हा केवळ एक दुवा असून प्रत्येक प्राणीमात्र आपल्या पूर्वजन्मींच्या कृत्यांमुळें आजच्या अवस्थेस पोचला आहे आणि आजच्या कृत्यांमुळें त्याचा भावी जन्म निश्चित होतो. आपण स्वर्ग, नरकादि अवस्थाही सान्तच मानतां. पण

आपणांस आपला एकही पूर्वजन्म आठवत नाहीं किंवा पुढचेंही कांहीं कळत नाहीं, हें कसें ?"

**बुद्ध :** आनंद, तूं फार मोठा प्रश्न विचारलास. पहिली गोष्ट म्हणजे जन्म व मृत्यु ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मृत्यूचें कारण कोठलाही रोग, अपघात, इत्यादि नसून जन्म हेंच मृत्यूचें कारण आहे. ह्या कार्यकारणांत आत्मा नेहमीं इकडून तिकडे व तिकडून इकडे फेकला जातो. नवा 'जन्म म्हणजे केवळ नवी अवस्था वा नवें वस्त्र. आतां पूर्वजन्मींचें आपणांस कांहीं आठवत नाहीं ह्याचें कारण आपली भौतिक स्मरणशक्ति ही अध्यात्मिक पुटें छेदून पूर्वींचे संस्कार वा स्मृति घेऊन येण्यास असमर्थ असते हेंच आहे. आत्मिक सामर्थ्यानें तुम्ही तुमचा पूर्वजन्म आणि भावी जन्म जाणूं शकतां.


**एक शिष्य :** आपण आपल्या पूर्वजन्मांविषयीं आम्हांस कांहीं सांगून उपकृत कराल काय ?

बुद्ध ह्यावर किंचित् हसले. नंतर क्षणभर अंतर्मुख होऊन म्हणाले, "शिष्यांनो, माझ्या पूर्वजन्मींची हकीकत सांगतों. कदाचित् त्यामुळें आपल्या उद्धाराची कांहीं कल्पना तुम्हांला येऊं शकेल.

"दोन जन्मांपूर्वीं मी वानर होतों. माझ्या जातबांधवांच्या सुखाकडे मी नित्य लक्ष देत असें. एका प्रचंड आम्रवृक्षावर आम्हीं राहात होतों. त्या वृक्षास फार मधुर फळें येत. एकदा त्याचा एक आंबा गंगेच्या प्रवाहांत पडून वाहात गेला. पुढें स्नान करीत असलेल्या काशीच्या राजाला तो दिसला. तें फळ पाहातांच राजाला आनंद झाला. एवढा मोठा व मधुर आंबा कुठें असेल ह्याचा तो विचार करूं लागला. प्रवाहाच्या उलट दिशेस त्यानें सर्वत्र आपले सेवक पाठविले आणि स्वत:देखील त्या झाडाच्या

शोधार्थ निघाला. अखेर त्यांना आमचें झाड सापडलें. झाडावर अनेक वानरें बसलेलीं पाहून राजानें त्यांना बाणांनीं ठार करण्याचा हुकूम केला. वानरें थरथर कांपूं लागलीं. कारण इकडे राजाचे चाकर उभे तर दुसरीकडे गंगेचा प्रवाह. झाडांवरून पैलतीरास उडी मारणें अशक्य होतें. मीं एक लांब बांबू घेतला आणि त्याचा प्रवाहावर पूल करूं लागलों पण तो थोडा अपुरा पडला. अखेर मीं तो बांबू माझ्या पाठीस बांधला आणि स्वतः एक किनारा धरून उभा राहिलों. आतां बांबूचें दुसरें टोक दुसऱ्या किनाऱ्यावर पोचलें होतें. वानरांना मी भराभर उड्या मारून पैलतीरास जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें एकामागून एक वानर सुरक्षित स्थळीं गेले. कांहींच्या उड्या माझ्या अंगावरच चुकून पडत. माझें शरीर पिचत होतें. पण मी तग धरून होतों. सर्वांत एक धिप्पाड माकड मागें राहिलें. त्यानें मुद्दाम धप्पदिशीं माझ्या अंगावरच उडी मारली. तें पैलतीराला पोचलें पण मी गतप्राण झालों. भिक्षूंनो, तें माकड म्हणजेच देवदत्त होय हें आज मी तुम्हांस सांगतों.

" त्यानंतर मी एक राजपुत्र बनलों. आमच्या जवळ एक पाऊस पाडणार दैवी हत्ती होता. मीं तो दानांत देऊन टाकला. नंतर आमच्या राज्यांत दुष्काळ पडला. लोक माझ्या अति औदार्यावर चिडले. मला व माझ्या कुटुंबीयांना हद्दपार करण्यांत आलें. त्या अवस्थेंत अनेक हालअपेष्टा सहन करीत आम्ही वाळवंटांतून चाललों होतों. रस्त्यांत मला पुन्हा कांहीं याचक भेटले. माझ्याजवळ होतें नव्हतें तें सर्व मी त्यांना देऊन टाकलें. अखेर माझी पत्नी व मुलें ह्यांचेंसुद्धा दान करून टाकलें व वाळवंटांतच मृत्युमुखीं पडलों. त्यानंतरच्या अवस्थेंत मी बोधिसत्त्व ( भावी बुद्ध ) म्हणून वावरत होतों. आतां माझा हा शेवटचा जन्म ! "



# भवसागरांत तुम्ही बेट बना

बुद्ध ऐशीं वर्षांचे झाले होते. पंचेचाळीस वर्षे पायाला भिंगरी लावून आपल्याला झालेल्या ज्ञानाच्या प्रसारार्थ ते देशाच्या कानाकोपऱ्यांत हिंडले. पण आतां शरीर थकलें होतें. प्रवासाचा शीण होई. ह्यामुळें आनंद अतिशय चिंतेंत पडला होता.

" प्रभु, आपल्यानंतर धर्माचें कसें होणार ? आम्हांला कांहींतरी आदेश द्या. " आनंद एके दिवशीं बुद्धांना म्हणाला.

आनंदच्या ह्या उद्गारांमुळें बुद्ध गंभीर झाले. किंचित् थांबून ते म्हणाले, "आनंद, जगाला मीच नित्य मार्ग दाखवीन, भावी पिढीसाठीं आदेश देईन असें कोणी समजत असेल तर तो बुद्ध कसा? मी आतां थोड्या दिवसांचाच सोबती आहें. त्यानंतर मी तुमच्यापासून दूर निघून जाणार हें खरें आहे. आजपासून तीन महिन्यांनीं मी निर्वाणाप्रत जाईन."

बुद्धांनीं हे उद्गार काढतांच पृथ्वी कंपायमान झाली. कारण त्या महापुरुषानें आपल्या ऐहिक परिसमाप्तीचा दिवस स्वतःच जाहीर करून टाकला होता. आनंदच्या डोळ्यांत जमा झालेले अश्रु पाहून बुद्ध म्हणाले :

"आनंद, ह्यांत शोक करण्यासारखें कांहींच नाहीं. ह्या जगांतील सर्व सजीवनिर्जीव वस्तु अशाश्वत आहेत. प्रत्येक क्षणास त्यांच्यांत बदल होत आहे. पर्वतसुद्धा कणाकणांनीं बदलत आहेत. जन्म, विकास, ऱ्हास व विनाश किंवा मृत्यु हें चक्र सर्वांनाच लागू आहे. रोग हें मृत्यूचें कारण नसून जन्म हें मृत्यूचें कारण आहे. जन्म म्हणजे दुःख, मृत्यु म्हणजेही दुःखच ! मीं तुम्हांला एक गोष्ट शिकविली, ती म्हणजे दुःख व दुःखाचा विनाश. आनंद हीसुद्धा दुःखाचीच दुसरी आवृत्ति आहे. जन्म-मृत्यु हेंच ह्या जगांतील सर्वांत मोठें दुःख आहे. ज्ञानप्राप्ति किंवा बोध हा त्यांतून सुटण्याचा मार्ग आहे. पण हा बोध कसा होणार? आनंद, ह्या भवसागरांत तुम्हींच स्वतःचीं आश्रयस्थानें — बेटें — बनलें पाहिजे. बाह्य आश्रय उपयोगी नाहीं. आत्म्याचा, धर्माचा, सत्याचा आश्रय घ्या."

बुद्ध आणि त्यांचे शिष्य फिरत फिरत चंद नांवाच्या एका लोहार शिष्याच्या गांवीं आले. चंदानें बुद्धांना जेवावयास बोलाविलें. त्यानें तयार केलेलें डुकराचें मांस व भात बुद्धांनीं प्रसन्न चित्तानें खाल्ला. पण त्यानंतर उरलेलें अन्न त्यांनीं कोणासही न देतां पुरून टाकण्यास सांगितलें. तें मांस

अनुक्रम २८९२० विभाग क्रमांक 37/3/6



इतकें वाईट अथवा अर्धकच्चें होतें असा त्यावरून कांहींजण निष्कर्ष काढतात.

चंदाच्या घरून परतल्यावर रस्त्यांतच बुद्धांना अस्वस्थ वाटूं लागलें. “ आनंद, तूं आधीं पुढें जा. एके ठिकाणीं तुला दोन सालवृक्ष दिसतील. तेथें माझ्यासाठीं बिछाना तयार कर. उशी उत्तरेकडे घाल. ” अशी आज्ञा करून ते खालीं बसले. आनंदची छाती धडधडूं लागली. त्याचे पाय जागचे हलेनात, पण तो कसाबसा निघाला.

थोड्या वेळानें बुद्ध अन्य शिष्यांसह त्या दोन वृक्षांजवळ पोचले आणि अंथरुणावर त्यांनीं अंग टाकलें. वसंत नसतांनाही वनांत फुलांचा सुवास सुटला होता. उन्हाची दाहकता संपली होती. सृष्टींत एक प्रकारची निस्तब्धता पसरली होती. क्षणभर डोळे मिटून विश्रांति घेतल्यानंतर बुद्धांनीं सर्व शिष्यांना जवळ बोलाविलें. “ तुमच्यापैकीं कुणाला कांहीं शंका आहे काय ? ” त्यांनीं विचारलें.

एका शिष्यानें धीर करून विचारलें, “ भगवन्, निर्वाण म्हणजे काय ? ”

बुद्ध उत्तरले, “ निर्वाण म्हणजे असा एक प्रांत आहे कीं जेथें पृथ्वी नाहीं, आप नाहीं, तेज नाहीं, वायु नाहीं, आकाश नाहीं, दिक्काल नाहीं, भान नाहीं, जाणीव नाहीं वा शून्यताही नाहीं. तेथें चंद्र-सूर्य, ग्रह-तारे, इहलोक-परलोक, जन्म-मृत्यु कांहीं नाहीं. तेथें दुःखाचा अन्त आहे. अंतिम सत्यता आहे, शाश्वतता आहे. पण निर्वाणाचें वर्णन करतां येणें शक्य नाहीं. ज्याची कल्पना होऊं शकते तें निर्वाण नव्हे ! निर्वाण हें सर्व कल्पनांपलीकडील आहे, तर्कातीत आहे. अशा परमश्रेष्ठ सत्याच्या साक्षात्काराबावत मौनच पाळणें इष्ट होईल. ”

**दुसरा शिष्य :** पण निर्वाणापलीकडे कांहीं आहे काय ?



IRBK-0105788

IRBK-0105788

**बुद्ध :** कुठलीही गोष्ट वा कल्पना सान्त नाहीं. निर्वाणसुद्धा सान्त नाहीं. त्यापलीकडे महापरिनिर्वाण आणि त्याहीपलीकडे अणखी कांहीं आहे. व्यावहारिक भाषेंत सांगावयाचें तर निर्वाण म्हणजे लोभ, द्वेष आणि मोह ह्यांचा विनाश व मनाची परमशांति होय !

त्यानंतर बुद्धांनीं डोळे मिटले. समाधि लागली. "प्रिय शिष्यांनो, मी जातों. पण त्यामुळें तुम्ही दु:खी होऊं नका. घाबरूं नका. अष्टांग नीतिमार्गाचा प्रसार करा. सर्व पदार्थांचा नाश हा ठेवलेलाच आहे. जाणीवपूर्वक स्वत:ची मुक्ति करून घ्या. धम्मावर श्रद्धा ठेवा." हेच त्यांचे अखेरचे शब्द. त्यानंतर बुद्ध निर्वाणाप्रत गेले. सर्वत्र शांतता पसरली. काशीपासून १२० मैलांवर असलेल्या कुशीनाराजवळ ही घटना घडली. बुद्धांचा जन्म आणि निर्वाण ह्या गोष्टी दोन्ही निसर्गाच्या कुशींत वृक्षाच्या छायेंतच घडल्या.

बुद्धांच्या निर्वाणाच्या वर्षाबद्दल कांहीं मतभेद आहेत. मॅक्समुल्लरसारखे पंडित खिस्ताब्दपूर्व ४४७ मध्यें तें घडलें असें सांगतात. पण आतां बहुतेक इतिहाससंशोधक खिस्ताब्दपूर्व ४८३ हेंच त्यांच्या निर्वाणाचें वर्ष मानतात.



त्यानंतर बुद्धांनीं डोळे मिटले. समाधि लागली.

."जें जें जन्माला आलें आणि जें जें अस्तित्वांत आहे त्या त्या सर्वांत विनाशाचीं बीजें असून त्यांचा विलय अपरिहार्य आहे. बुद्धांचें हें पार्थिव शरीरही आतां पंचमहाभूतांत विलीन होईल. भिक्षूंनो, प्रभूंनीं सांगितल्या-प्रमाणें शोक आवरा, बुद्धाचा, संघाचा नि धम्माचा, जयजयकार करा." असें सर्वांत वृद्ध भिक्षु अनिरुद्धानें सांगितल्यावर आनंद आणि इतर सर्वांनीं शोक आवरला. सात दिवसांनंतर बुद्धांच्या देहास अग्निसंस्कार करण्यांत आला. रक्षा दहा भागांत वांटण्यांत आली. पुढें निरनिराळ्या ठिकाणीं प्रचंड स्तूप अथवा पॅगोडा बांधून त्यांत हे पवित्र अस्थि-अवशेष जतन करून ठेवण्यांत आले. बुद्धांचें जन्मस्थान लुम्बिणी वन, निर्वाणस्थान कुशीनारा, बोधप्राप्तिस्थान बुद्धगया, प्रथम प्रवचनस्थान सारनाथ आणि सारीपुत्त व मोगल्लन् ह्यांचे अस्थि-अवशेष असलेलें सांची हीं आतां भारतांतील यात्रास्थानें बनलीं आहेत.

. आज पंचवीसशें वर्षें लोटल्यावरसुद्धा जगभर बुद्धांच्या विचारलाटा पसरत आहेत. कोठल्याही प्रकारचा धार्मिक कडवेपणा, लष्करी सामर्थ्याचा पाठिंबा किंवा संघटित प्रयत्न न करतांही बौद्धधर्माचा प्रसार सतत वाढत आहे. भारतासारख्या देशांत हिंदुधर्मांतच बुद्धधर्म विलीन झाला, त्यामुळें हिंदुधर्म अधिक सुसंपन्न बनला. चीनमध्यें ताओ, कन्फ्यूशियन धर्मांस बुद्धांच्या शिकवणीचें तेज मिळालें. अनेक देशांत बुद्धविचारांनीं धर्म, संस्कृति व कलेच्या क्षेत्रांत नवें युग निर्माण केलें. आज राजकीय क्षेत्रांत हैड्रोजन बॉम्बला प्रतिस्पर्धी म्हणून 'पंचशील'च्या रूपानें बुद्धांचीं नीतितत्त्वें, व्यक्तिगत पातळीवरून आंतरराष्ट्रीय पातळीवर येत आहेत. बुद्धजयंतीनिमित्तानें ह्यापेक्षां अधिक आनंददायक घटना दुसरी कोठली असूं शकेल ?

⊙ ⊙ ⊙

अनुक्रम
विभाग
क्रमांक

* * * * * * * * * * * * * * * * * * * *